रायगड, शुक्रवार, दि. ३ जानेवारी २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹




# भ्रष्ट अधिकाऱ्यांची लाचखोरी

## वर्षभरात सात जणांविरोधात कारवाई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वेगवेगळ्या कारणांवरून लाच मागणाऱ्या लाचखोरांना रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दणका दिला आहे. वर्षभरात सात जणांविरोधात कारवाई करून त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये शिक्षण विभागातील कर्मचाऱ्याला ४० हजार रुपये आणि वित्त विभागातील कर्मचाऱ्याला ८१ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

वेगवेगळे दाखले, परवानगीसाठी शासकीय कार्यालयात अर्ज केला जातो. त्यानंतर त्याची पडताळणी करून संबंधित विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांमार्फत अर्जदाराला दाखला व परवानगी मिळते. परंतु, जिल्ह्यातील काही शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी लाच घेऊन काम करतात. सर्वसामान्यांना हा प्रकार कायमच डोकेदुखी ठरत आहे. आपले काम वेळेत होत नसल्याने अर्जदारांमध्ये त्या पद्धतीविरोधात प्रचंड संताप निर्माण होतो. वारंवार फेऱ्या मारूनदेखील काम होत नसल्याने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात नाराजीचे सूर उमटतात.

ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषद व अन्य शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत लाच घेऊन काम करण्याचा प्रकार रोखण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जिल्ह्यात कार्यरत आहे. ही एक स्वतंत्र यंत्रणा असून, या यंत्रणेमार्फत सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

लाचलुचपत प्रतिबंधक, रायगड विभागामार्फत लाच घेणाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचा वारंवार प्रयत्न केला जातो. फलक, पत्रक वाटप अशा वेगवेगळ्या उपक्रमांमधून जनजागृती करण्याचा प्रयत्न होत आला आहे. तरीदेखील काहींनी काम पूर्ण होण्यासाठी लाचेची मागणी केली आहे. त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा दणका मिळाला आहे.

पोलीस विभागातील कर्मचाऱ्याने दाखल झालेल्या तक्रारीवरून कारवाई न करण्यासाठी लाच घेतली होती. शिक्षण विभागातील कर्मचाऱ्याने बिल मंजुरीसह पगार देण्यासाठी लाच मागितली होती. ग्रामसेवकाने नोंद करण्यासाठी लाच घेतली घेतली होती.

या कारवाईमुळे •> पान २ वर

### महसूल, शिक्षण विभाग अव्वल

- जानेवारी ते डिसेंबर २०२४ या वर्षात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सात ठिकाणी सापळे रचून लाच घेणाऱ्यांना रंगेहाथ पकडले आहे.
- महसूल विभागातील दोन, शिक्षण विभागातील दोन, वित्त विभागातील एक, ग्रामपंचायतीमधील एक व पोलीस विभागातील एकाचा समावेश आहे.

> **वर्षभरात लाच घेणाऱ्यांविरोधात वर्षभरात सात कारवाया झाल्या आहेत. कोणीही लोकसेवक लाच मागत असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. तसेच कोणाला लाचही देऊ नये.**
> **– शशिकांत पाडावे,** उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक, रायगड विभाग

# वनक्षेत्रात अतिक्रमण

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

**वनाचे क्षेत्र वाढविण्याबरोबरच त्याचे संवर्धन करण्यासाठी वन विभाग शर्थीचे प्रयत्न करीत आहे. परंतु, काही मंडळी याच वनाच्या क्षेत्रातील काही जागांमध्ये हातभट्टी तयार करणे, शेड बांधणे, कुंपण घालणे, असे प्रकार करून अतिक्रमण करीत आहेत. अलिबाग तालुक्यातील १२ हेक्टर क्षेत्राला अतिक्रमणाने विळखा घातला आहे. ४० जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. परंतु, कारवाई करूनही अतिक्रमण हटविण्यास यंत्रणा उदासीन ठरत असल्याचे चित्र आहे.**

अलिबाग तालुक्यात वनाचे १२ हजार हेक्टर क्षेत्र आहे. वनसंपदा टिकून ठेवण्याबरोबरच तेथील वन्यप्राण्यांचा अधिवास कायम राहावा यासाठीदेखील वन विभागाकडून प्रयत्न केला जातात. वणव्याबरोबरच वन विभागातील काही अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे वनाच्या जागेत खुलेआमपणे अतिक्रमण करून ती जागा बळकाविण्याचा प्रयत्न काही मंडळी करतात. त्याच जागेमध्ये कुंपण करणे, तेथील साग व इतर झाडांची तोड करून आपली जागा असल्याचा दावा अतिक्रमण करणारे करीत असतात. स्थानिक वन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाठबळाशिवाय हे होऊ शकत नाही, असे ही बोलले जात आहे.

वनाच्या संवर्धन व संरक्षणासाठी या क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या रोपांची लागवड केली जाते. परंतु, या रोपांचे संवर्धन होत नसल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे. लाखो रुपये खर्च करून रोपांची लागवड करूनही त्या रोपांना वाढविण्यास वन विभाग उदासीन ठरल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. पशु, पक्षीप्रेमींनी याबाबत अनेकवेळा •> पान २ वर



**12 हेक्टर वन क्षेत्राला विळखा**

**कारवाई करूनदेखील अतिक्रमण क्षेत्र हटविण्यास यंत्रणा उदासीन**

### वन्यप्राण्यांचा अधिवास संकटात

- वाढत्या अतिक्रमणामुळे वन्यप्राण्यांचा अधिवास संकटात सापडलेला असताना वनाचे क्षेत्र घटण्याची भीतीही निर्माण झाली आहे. याकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.
- वनक्षेत्रात होणारे अतिक्रमण ही बाब खूप गंभीर आहे. कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. गुन्हे दाखल झाले पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून केली जाते.
- कार्यवाही सुरू असल्याचा वनखात्याचा दावा आहे. परंतु, कारवाई करूनही त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण कसे होते, असाही प्रश्न अनेकांकडून उपस्थित केला जात आहे.

> **अलिबाग तालुक्यातील एकूण वन क्षेत्रापैकी १२ हेक्टर क्षेत्रामध्ये अतिक्रमण झाले आहे. अंदाजे ४० जणांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. गुन्हेही दाखल झाले आहे. नवीन अतिक्रमण दिसून येत नाही. जे अतिक्रमण झाले आहे, ते जुने आहे. मात्र, अतिक्रमण रोखण्याचा विभागाकडून प्रयत्न केला जाईल. संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल.**
> **– नरेंद्र पाटील, वन परिक्षेत्र अधिकारी, अलिबाग**

## वेधक

### ‘तीन महिन्यांत सरकार कोसळणार’

**मुंबई :** राज्यात ईव्हीएमवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आ. उत्तम जानकर यांनी तीन महिन्यांत राज्यातलं सरकार पडणार आहे, त्याचे पुरावे मी सादर केल्यावर देश गडबडून जाईल. सरकार शंभर टक्के जाणार आणि पुन्हा निवडणुका घ्यावा लागणार, असा दावा केला आहे. ते पुढे म्हणाले की, ईव्हीएम मशीनमध्ये घोटाळा नसेल तर माळशिरस विधानसभा आणि बारामती विधानसभा मतदारसंघात बॅलेट पेपरवर पुन्हा निवडणुका घेऊन दाखवा, अजित पवार दहा हजार मतांनी पराभूत होतील.

### सव्वा तीन लाखांचे कोकेन हस्तगत

**पनवेल :** खारघर वसाहतीमधील सेक्टर २७ येथील बी.डी. सोमानी शाळेसमोरील रस्त्यावर पोलिसांनी एका व्यक्तीला सव्वातीन लाखांच्या कोकेन या अमली पदार्थासह अटक केली. बासील रोनाल्डो ओबीओरो असे अटक आरोपीचे नाव आहे. खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली सेक्टर २७ येथील मेट्रो पुलासमोरील रस्त्यावर पोलीस निरीक्षक शीतल पाटील, पोलीस उपनिरीक्षक वर्षा काळे, पोलीस शिपाई श्रीकांत म्हात्रे यांच्यासह सापळा लावून एका संशयित दुचाकीस्वाराला ताब्यात घेतले. त्याच्याकडून तीन पिशव्यांमध्ये ३२.२८ ग्रॅम वजनाचे कोकेन सापडले.

# अपुऱ्या रिक्षांमुळे पर्यटकांचा खोळंबा

## ई-रिक्षाच्या मर्यादित संख्येमुळे नाराजी

**। माथेरान । वार्ताहर ।**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी माथेरानमध्ये देश-विदेशातून अनेक पर्यटक दाखल झाले होते. सरत्या वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी माथेरान सज्ज असताना पर्यटकांचा उत्साही ओसंडून वाहताना दिसला होता; परंतु आज माथेरानमधून जाताना मात्र पर्यटकांना ई-रिक्षाकरिता लांबच्या लांब रांगांना सामोरे जावे लागले. अपुऱ्या रिक्षांमुळे पर्यटकांचा खोळंबा झालेला दिसून आला.

मागील काही दिवसांपासून माथेरानमध्ये पर्यटकांचा ओघ वाढला असून, नवीन वर्षाच्या स्वागतासाठी येथे अनेक पर्यटक दाखल झाले होते, तर नाताळच्या सुट्ट्यांमध्येही पर्यटक माथेरानमध्ये मोठ्या प्रमाणात आले होते. त्यामुळे येथील वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. माथेरानकरिता मिनी ट्रेनच्या अपुऱ्या फेऱ्या, नियोजनाचा अभाव, तर ई-रिक्षांची मर्यादित संख्या यामुळे येथे येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दिव्यांग पर्यटक महिला, मुले यांना त्याचा मोठा फटका दिसून आला. मिनी ट्रेनच्या सफरीकरिता लांबच्या लांब रांगा पहावयास मिळत होत्या. तर ई-रिक्षाकरिता दोन तास रांगेमध्ये उभे राहिल्यानंतर पर्यटकांना रिक्षा उपलब्ध होत होत्या. त्यामुळे पर्यटकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी दिसून आली.



> **माथेरान ९४ हातरिक्षा असताना फक्त २० ई-रिक्षांना परवानगी दिली गेली आहे. या ई-रिक्षांमधून माफक म्हणजे फक्त ३५ रुपये दर प्रतिव्यक्ती असल्याने पर्यटकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळेच मागील काही दिवसांपासून येथे पर्यटकांचा ओघ वाढलेला दिसून येतो. परंतु या रिक्षांमध्ये वाढ व्हावी तसेच बॅगासुद्धा घेण्यात याव्यात, ही आम्हा सर्व पर्यटकांची मागणी आहे.**
> **– अनुप मढवी, पर्यटक मुंबई**

# प्रीपेड स्मार्ट मीटर बसवू नका

## शेकापच्या ठाणे जिल्हाध्यक्षांची मागणी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

प्रीपेडस्मार्टमीटरसर्वसामान्यांची लूट करणारे आहे. त्यामुळे हे मीटर बसविण्यात येऊ नये, अशी मागणी ठाणे येथील शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रसाद साळवी यांनी केली आहे. शासनाने त्या पद्धतीने निर्णय काढून जनतेचे हित साधावे. असे सांगत सादर केलेल्या निवेदनात प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याच्या योजनेविरोधात ठाण्यातील नागरिकांची आणि राज्यभरातील लोकांची भूमिका स्पष्ट केली आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही मागणी सादर केली. त्यांनी म्हटले की, महाराष्ट्रात स्मार्ट मीटर बसविण्याच्या विरोधात लोकांच्या भावना आहेत. मागील सरकारच्या काळात अनेक राज्यांमध्ये याच्या विरोधात तीव्र जनमत तयार झाले होते. यामुळे मोठ्या प्रमाणात विरोधाचा सामना करावा लागला होता. ठाण्यात तसेच महाराष्ट्रभरात तसेच संपूर्ण भारतात याचा विरोध कायम आहे.

वीज वितरण प्रणालीचे खासगीकरण होऊ नये, यासाठी मुख्यमंत्री तसेच ऊर्जामंत्री व उपमुख्यमंत्री यांना शेतकरी कामगार पक्षाने पत्र पाठवले आहे. या पत्रात, ‘स्मार्ट मीटर’ योजना एक धोका ठरू शकते, हे लक्षात घेत •> पान २ वर




# वाळवंटात अवतरली सरस्वती?



**। जयपूर । वृत्तसंस्था ।**

राजस्थानमधील जैसलमेर जिल्ह्यातील मोहनगडमध्ये बोअर खोदत असताना अचानक जमिनीतून आवाज झाला आणि पाण्याचा मोठा फवारा उसळून वर आला. या खड्ड्यातून वेगाने पाणी वर येत होतं. धक्कादायक बाब म्हणजे, खोदकामाची उपकरणं आणि ट्रकदेखील या खड्ड्यात गेला. या घटनेनंतर मोहनगडमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. वाळवंटी भागात अचानक पाण्याचा मोठा फवारा वर आल्यानं आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. दरम्यान, लुप्त झालेली सरस्वती नदी पुन्हा अवतरल्याचाही दावा करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विक्रम सिंह भाटी यांच्या शेतात बोअरवेलचं खोदकाम सुरू होतं. त्यानंतर अचानक जमीन फाटली आणि दबावाने पाणी, गॅस बाहेर येऊ लागला. याबाबत माहिती मिळताच जिल्हाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. •> पान २ वर

# कानून के हात लंबे होते है!

## पोलिसांनी केले दोन हजार २९ गुन्हे उघड

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात २०२४ या वर्षात ३२ खुनाचे गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यापैकी ३० गुन्हे उघडकीस आले आहेत, तर २७ खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल झाले होते. पैकी २७ गुन्हे उघड करण्यात पोलिसांना यश आले आहे. सन २०२३ च्या तुलनेत दोनने गुन्ह्याचे प्रमाण कमी झाले आहे, अशी माहिती रायगडच्या जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने दिली. रायगड जिल्ह्यात सन २०२४ मध्ये २५४० गुन्हे दाखल झाले होते. दोन हजार १९३ उघडकीस आले आहेत. पैकी ४६१ गुन्हे प्रलंबित असून, हे प्रमाण १७ टक्के आहे.

महिलांवर अत्याचारामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनते पाचने वाढ झाली आहे. २०२४ मध्ये विनयभंगाचे १५७ गुन्हे दाखल झाले होते. पैकी १५२ गुन्हे उघडीस आले. पोलिसांनी सहा गुन्हेगारी टोळ्या हद्दपार केल्या आहेत, तर ३५ जणांना तडीपार केले आहे.

दरोड्याचा एक गुन्हा दाखल झाला होता, पैकी एक गुन्हा उघडकीस झाला आहे. सन २०२३ च्या तुलनेत एकने गुन्ह्याचे प्रमाण कमी झाले आहे. ३२ जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी २६ गुन्हे उघड करण्यास पोलिसांना यश आले असून, त्याचे प्रमाण ८१ टक्के आहे. सन २०२३ च्या तुलनेत १२ ने गुन्ह्याचे प्रमाण कमी झाले आहे. घरफोडीचे १६१ गुन्हे दाखल होते. पोलिसांनी ७५ गुन्हे उघड केले आहेत. त्याचे प्रमाण ५७ टक्के असून, सन २०२३ च्या तुलनेत १४ ने गुन्ह्याचे प्रमाण कमी झाल्याचे आकडेवारीवरुन दिसून येते. चोरीचे ३६५ गुन्हे दाखल असून, त्यापैकी १९५ गुन्हे उघड झाले आहेत. दंगलीचे ११४ गुन्हे दाखल होते, पैकी ११४ गुन्हे उघड करण्यास पोलिसांना यश आले असून, त्याचे प्रमाण १०० टक्के आहे. सन २०२३ च्या तुलनेत तीनने गुन्ह्याचे प्रमाण कमी झाले आहे. वेळोवेळी केलेल्या प्रतिबंधात्मक कारवायांमुळे दंगलीचे गुन्हे कमी झाले आहेत.

### १०० टक्के यश

महिलांवर बलात्काराचे १०७ गुन्हे दाखल होते. त्यामध्ये ७४ गुन्हे पोक्सोंतर्गत आहेत. १०० टक्के गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

# अजित पवारांच्या ताफ्यामध्ये वाल्मिक कराडची गाडी

## खा. बजरंग सोनावणे यांचा आरोप

**। बीड । प्रतिनिधी ।**

अजित पवार मस्साजोगला संतोष देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांच्या कुटुंबियांची भेट घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्या गाड्यांच्या ताफ्यात आरोपी वाल्मिक कराडची गाडीसुद्धा होती, असा धक्कादायक आरोप बजरंग सोनावणे यांनी केला. १२ तारखेला वाल्मीक कराड आणि पोलीस यंत्रणा यांची नेत्याच्या कार्यालयात भेट झाली. पंधरा तारखेला शपथविधी सोहळ्याला आरोपी वाल्मिक कराड नागपूरमध्ये हजर होता, असा आरोप खासदार बजरंग सोनावणे यांनी केला आहे. परळीतून पुणे मग गोवा आणि पुन्हा पुणे असा वाल्मिक कराडचा प्रवास सुरु असताना पोलीस काय करत होते, असा सवाल बजरंग सोनावणे यांनी विचारला आहे.



ज्या दिवशी ते शनिवारी १६ तारेखला आले, त्यांच्या ताफ्यामध्ये गाडी होती. त्या गाडीत हा आरोपी होता, तो तिथे जाऊन सरेंडर होतो. याचा अर्थ काय? ताफ्यामधील आरोपी तिथे जाऊन सरेंडर होतो. मस्साजोगला ही गाडी होती. त्याच गाडीमधील आरोपी जाऊन शरणगती देतोय. •> पान २ वर

**२६ जानेवारीला उपक्रम राबवा | सुट्टी रद्दचा शासन निर्णय जाहीर**

# शाळांच्या हातावर बसणार छडी

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

२६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण देशात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी देशात सर्वत्र शालेय विद्यार्थ्यांना सार्वजानिक सुट्टी दिली जाते. महाराष्ट्र सरकारने प्रजासत्ताक दिनाची सुट्टी रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, या कालावधीत सर्व शाळांनी विविध उपक्रम राबवण्याचे आदेश सरकारने एका परिपत्रकाव्दारे दिले आहेत. ज्या शैक्षणिक संस्था हा आदेश धुडकावून लावतील त्यांच्यावर संबंधित शिक्षण विभाग कारवाई करणार आहे.

विद्यार्थ्यांना सुट्टी देण्याऐवजी शाळाप्रशासनानेशाळेतदेशभक्तीपर कार्यक्रमांचं आयोजन करावं आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करावी, असे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यामुळे यावर्षीपासून महाराष्ट्रात शालेय विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाची सुट्टी मिळणार नाही. याऐवजी त्यांना शाळेतील विविध कार्यक्रमांना आणि स्पर्धांना उपस्थित राहावे लागणार आहे. विशेष म्हणजे, यावर्षी २६ जानेवारीला रविवार आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये प्राथमिक (२,५२८) आणि माध्यामिक (६००) विभागाच्यामिळून ३,१२८ शाळा आहेत, तर विद्यार्थ्यांची संख्या सुमारे साडेसहा लाखांच्या आसपास आहे. यासर्व शाळांना सदरचा उपक्रम राबवण्याच्या सूचना संबंधित विभागाकडून देण्यात आल्या आहेत. हे परिपत्रक जारी करण्याच्या आधीपासून काही शाळा असे उपक्रम राबवत आल्या आहेत. त्यामध्ये नवीन काही नाही. मात्र, अन्य शाळा यापासून पळ काढण्याचा प्रयत्न करतात. त्यांना मात्र, आता या परिपत्रकातील आदेशाचे पालन करावे लागणार आहे.

ज्या शैक्षणिक संस्था शालेय विभागाच्या परिपत्रकाला प्रतिसाद देणार नाहीत, त्यांची माहिती स्थानिक पातळीवरील गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फत गोळा केली जाणार आहे. त्यानंतर संबंधितांना कोणती शिक्षा द्यायची याचा निर्णय घेण्यात येणार आहे.

### अन्यथा शाळांवर कारवाईचे ओदश

- २६ जानेवारीला विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राचा इतिहास, आपली महान संस्कृती आणि देशाचे भविष्य याबद्दल अभिमानाची भावना निर्माण केली पाहिजे.
- २६ जानेवारी २०२५ पासून सर्व सरकारी आणि खासगी शाळांमध्ये विविध कार्यक्रम ांसह साजरा केला जाईल, असे परिपत्रक जाहीर.

> **ज्या शैक्षणिक संस्था आदेशाचा भंग करतील. त्याची माहिती शालेय शिक्षण विभागाला कळवण्यात येणार आहे. परिस्थिती नुसार त्यांच्यावर काय कारवाई करायची आहे. हे मार्गदर्शन घेऊन ठरवण्यात येईल.**
> **– पुनीता गुरव,** शिक्षणाधिकारी, प्राथमिक

# मनू भाकर, डी गुकेश, हरमनप्रीत यांना खेलरत्न

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरा थलीट प्रवीण कुमार यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने गुरुवारी (दि. २) या क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली. १७ जानेवारी २०२५ (शुक्रवार) रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रपती भवनात एका विशेष समारंभात पुरस्कार विजेत्यांना भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

गुकेश गेल्या महिन्यात वयाच्या १८ व्या वर्षी •> पान २ वर




### क्रीडा मंत्रालयाकडून घोषणा

**अर्जुन पुरस्कार (आजीवन)**
१. सुचा सिंग (थलेटिक्स) २. मुरलीकांत राजाराम पेटकर (पॅरा-स्विमिंग).

**द्रोणाचार्य पुरस्कार**
१. सुभाष राणा (पॅरा-शूटिंग) २. दीपाली देशपांडे (शूटिंग) ३. संदीप सांगवान (हॉकी).

**द्रोणाचार्य पुरस्कार (आजीवन)**
१. एस. मुरलीधरन (बॅडमिंटन) २. अरमांडो ऍग्रेलो कोलाको (फुटबॉल).

**राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार**
१. फिजिकल एज्युकेशन फाउंडेशन ऑफ इंडिया.

**मौलाना अबुल कलाम ट्रॉफी**
१. चंदिगड विद्यापीठ (एकूणच विजेते विद्यापीठ) २. लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (प्रथम उपविजेते विद्यापीठ) ३. गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर (द्वितीय रनर अप विद्यापीठ).

पान १ वरून

## वनक्षेत्रात अतिक्रमण

नाराजीही व्यक्त केली आहे. वाढत्या अतिक्रमणामुळे वन्यप्राण्यांचा अधिवास संकटात सापडलेला असताना वनाचे क्षेत्र घटण्याची भीतीही निर्माण झाली आहे. याकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. कार्यवाही सुरू असल्याचा वनखात्याचा दावा आहे. परंतु, कारवाई करूनही त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण कसे होते, असाही प्रश्न अनेकांकडून उपस्थित केला जात आहे.

वनक्षेत्रात होणारे अतिक्रमण ही बाब खूप गंभीर आहे. कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. गुन्हे दाखल झाले पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून केली जाते. अलिबाग तालुक्यात १२ हेक्टर क्षेत्रात अतिक्रमण झाले आहे. वन विभागाने अनेकवेळा कारवाईदेखील केली आहे. ४० जणांविरोधात गुन्हेही दाखल केले आहेत. परंतु, तालुक्यात अतिक्रमणाची परिस्थिती जैसे थे अशीच असल्याचे चित्र आहे. याकडे वन अधिकारी गांभीर्याने लक्ष देतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## प्रीपेड स्मार्ट मीटर बसवू नका

या योजनेला विरोध करण्यात येत आहे. यावेळी ठाणे जिल्हाध्यक्ष प्रसाद साळवी, ठाणे शहर अध्यक्ष ऋषिकेश तायडे, युवक आघाडीचे निखिल सशीधरण, विभाग अध्यक्ष चंदन भारद्वाज, शांतीनगर शाखा अध्यक्ष किशोर ननावरे, साईनाथ मोरे, मुकेश भोईर, सिद्धार्थ तायडे, आदित्य वाघमारे आदी कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते.

मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आदेश देऊन प्रीपेड स्मार्ट मीटर बसविणे थांबवावे. ठाणे महावितरणच्या मुख्य अभियंत्यांना निवेदन देण्यात आले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आम्ही सरकारला हा मुद्दा सुस्पष्टपणे मांडला असून, जनतेच्या भल्यासाठी सरकार या बाबींचा गांभीर्याने विचार करेल, अशी आम्हाला आशा आहे. अन्यथा शेतकरी कामगार पक्ष जनतेसाठी रस्त्यावर उतरल्याशिवाय गप्प बसणार नाही, अशी प्रतिक्रिया साळवी यांनी दिली.

## अजित पवारांच्या ताफ्यामध्ये वाल्मिक कराडची गाडी

गाडी कोणाच्या नावावर आहे, असा सवाल बजरंग सोनावणे यांनी केला.

मागच्या मे महिन्यात जो गुन्हा दाखल होता, तेव्हा जर कारवाई झाली असती तर हे सगळं घडलं नसतं. पोलिसांनी वेळीच गुन्हा दाखल केला असता तर हे झालं नसतं, असा दावा बजरंग सोनावणे यांनी केला. आमच्या खंडणी गोळा करण्याच्या कामात जर अडथळा निर्माण केला, तर काय होतं हे दाखवण्यासाठी असं मारलं. ज्या दिवशी हत्या झाली तेव्हा हा आरोपी परळीत होता. हत्या झाल्यानंतर आरोपी आणि पोलिसांची भेट झाली, असा दावा बजरंग सोनावणे यांनी केला.

**फार्म हाऊसवर भेट**

त्यानंतर हा आरोपी एका नेत्याच्या फार्म हाऊसवर भेटला. त्यानंतर आरोपी शपथविधीला पोहोचतो. तेव्हा अटक का झाली नाही, असा सवाल बजरंग सोनावणे यांनी केला. अजित पवार जेव्हा मस्साजोगला आले, तेव्हा त्यांच्या ताफ्यात जी गाडी होती, त्याच गाडीतून हा आरोपी पोलीस ठाण्यात पोहोचला. पुण्यात आरोपी ज्या घरात थांबला त्याचा तपास व्हायला पाहिजे, अशी मागणी बजरंग सोनावणे यांनी केली आहे.

## भ्रष्ट अधिकाऱ्यांची लाचखोरी

लाच घेणाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जिल्ह्यातील शासकीय कार्यालयात वेगवेगळ्या कामांसाठी लाच मागणाऱ्या लोकसेवकांविरोधात तक्रार देण्याचे आवाहन उपअधीक्षक शशिकांत पाडावे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे.

## वाळवंटात अवतरली सरस्वती?

या घटनेनंतर ५०० मीटरपर्यंतचा परिसर रिकामा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जवळपास ८५० फुटांपर्यंत बोअरवेल खोदण्यात आली होती. पाण्याचा शोध सुरू असताना अचानक जमिनीवरून मोठ्या वेगाने पाणी बाहेर येऊ लागलं. यावेळी मशिनीसह ट्रकही जमिनीत गाडला गेला आणि पाण्याचे १० फूट उंच कारंजे उडू लागले. पाण्याच्या कारंज्यासह गॅसही बाहेर येऊ लागला. गॅस बाहेर येऊ लागल्याने गावकऱ्यांसह प्रशासनामध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. हा गॅस कसला आहे, याचा शोध घेण्यासाठी ओएनजीसी, केअरन एनर्जी, ऑईल इंडियाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पाण्याच्या प्रवाहामुळे आजूबाजूचा ५०० मीटरहून अधिकच्या परिसराला तलावाचं रूप आलं होतं. वाळवंटात पाण्याचे झरे वाहू लागल्याने अनेक अफवादेखील पसरू लागल्या. याठिकाणाहून आधी सरस्वती नदी वाहत होती आणि याच लुप्त झालेल्या प्राचीन सरस्वती नदीचा पुन्हा उगम झाल्याचा दावा केला जात आहे.

## मनू भाकर, डी गुकेश, हरमनप्रीत यांना खेलरत्न

सर्वात तरुण जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन बनला होता. हरमनप्रीत सिंगने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारतीय पुरुष हॉकी संघाचे नेतृत्व करत सलग दुसरे कांस्यपदक मिळवले, तर पॅरालिम्पिक उंच उडीपटू प्रवीणने २.०८ मीटरच्या विक्रमी उडीसह सुवर्णपदक जिंकले. अर्जुन पुरस्कारासाठी जाहीर करण्यात आलेल्या ३२ खेळाडूंच्या यादीत १७ पॅरा ॲथलीट्सचा समावेश आहे. मनू भाकरने ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पार पडलेल्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दोन ऑलिम्पिक कांस्य पदके जिंकली होती. १० मीटर एअर पिस्तूल वैयक्तिक प्रकारात आणि मिश्र दुहेरीमध्ये ती तिसऱ्या क्रमांकावर राहिली. तिच्या दोन पदकांच्या जोरावर भारताने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये एकूण ६ पदके जिंकली.

**खेलरत्न पुरस्कार विजेते**

१. डी गुकेश (बुद्धिबळ)२. हरमनप्रीत सिंग (हॉकी)३. प्रवीण कुमार (पॅरा थलेटिक्स)४. मनू भाकर (शूटिंग).

**अर्जुन पुरस्कार विजेते**

१. ज्योती याराजी (थलेटिक्स)२. अन्नू राणी (थलेटिक्स)३. नीतू (बॉक्सिंग)४. स्वीटी (बॉक्सिंग)५. वंतिका अग्रवाल (बुद्धिबळ)६. सलीमा टेटे (हॉकी)७. अभिषेक (हॉकी)८. संजय (हॉकी)९. जर्मनप्रीत सिंग (हॉकी)१०. सुखजित सिंग (हॉकी)११. राकेश कुमार (पॅरा तिरंदाजी)१२. प्रीती पाल (पॅरा थलेटिक्स)१३. जीवनजी दीप्ती (पॅरा थलेटिक्स)१४. अजित सिंग (पॅरा थलेटिक्स)१५. सचिन सर्जेराव खिलारी (पॅरा थलेटिक्स)१६. धरमबीर (पॅरा थलेटिक्स)१७. प्रणव सुरमा (पॅरा थलेटिक्स)१८. एच होकातो सेमा (पॅरा थलेटिक्स)१९. सिमरन जी (पॅरा थलेटिक्स)२०. नवदीप (पॅरा थलेटिक्स)२१. नितेश कुमार (पॅरा बॅडमिंटन)२२. तुलसीमाथी मुरुगेसन (पॅरा बॅडमिंटन)२३. नित्य श्री सुमती सिवन (पॅरा बॅडमिंटन)२४. मनीषा रामदास (पॅरा बॅडमिंटन)२५. कपिल परमार (पॅरा ज्युदो)२६. मोना अग्रवाल (पॅरा नेमबाजी)२७. रुबिना फ्रान्सिस (पॅरा नेमबाजी)२८. स्वप्नील सुरेश कुसळे (शूटिंग)२९. सरबज्योत सिंग (शूटिंग)३०. अभय सिंग (स्क्वॉश)३१. साजन प्रकाश (पोहणे)३२. अमन (कुस्ती).

# वीर भाई कोतवाल यांची पुण्यतिथी साजरी

## ■ नाभिक समाजाच्या पुढाकारातून कार्यक्रम


(छायाचित्र : महेश पवार)

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नाभिक समाजाचे रायगडचे क्रांतीसुर्य वीर भाई विठ्ठल लक्ष्मण कोतवाल म्हणजेच हुतात्मा वीर भाई कोतवाल यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवारी (दि.२) सकाळी समाजाचे मार्गदर्शक भाई टके यांच्या निवासस्थानी नागोठणे शहरातील नाभिक समाज बांधव एकटवले व तेथून सकाळी ५.३० वाजता मशाल ज्योत घेऊन प्रभात फेरीस प्रारंभ झाला.

हुतात्मा वीर भाई कोतवाल अमर रहे, हुतात्मा हिराजी पाटील अमर रहे, भारत माते की जय अशा घोषणा देत प्रभात फेरी नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात आल्यानंतर मंदिरा समोरील दीपस्तंभावर सकाळी ६.१० वाजता ज्योत पेटवून हुतात्मा वीर भाई कोतवाल व हुतात्मा हिराजी पाटील यांना अभिवादन करण्यात आले. तदनंतर सकाळी १०.३० वाजता नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयात हुतात्मा विरभाई कोतवाल यांच्या प्रतिमेस नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य संतोष नागोठणेकर, सदस्या शबाना मुल्ला, पूनम काळे, अमृता महाडिक, भाविका गिजे आदी मान्यवरांसह नाभिक समाज बांधव उपस्थित होते.

दरम्यान, यावेळी हुतात्मा वीर भाई कोतवाल यांच्या महान कार्याची माहिती व त्यावेळचा इतिहास ग्रामपंचायतीचे वरिष्ठ लेखनिक प्रमोद चोरगे यांनी आपल्या प्रास्ताविकेत सांगितला तसेच नाभिक समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते उदंड रावकर यांनी आभार व्यक्त केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

हुतात्मा वीर भाई कोतवाल यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमास नाभिक समाजाचे युवा नेतृत्व बाळासाहेब टके, शैलेश रावकर, हरीश टके, शामकांत नेरपगार, महेंद्र माने, दिगंबर खराडे, रविंद्र टके, सुधाकर निंबाळकर, मिलिंद गुजर, ॲड. रमेश जाधव, महेंद्र पवार, संतोष माने, मनोज गायकवाड, मंगेश गायकवाड, विलास भोसले, राजू माने, अमित मोरे, महेंद्र जाधव, रुपेश साळुंखे, यल्लाप्पा हडपर, गिरीधर दिवेकर, अनिल चव्हाण, राजेंद्र माने, प्रशांत टके, चंदन माने, नम्रता माने, सारिका निंबाळकर, स्मिता गुजर, प्रियांका टके, शेजल खराडे, उदंड रावकर, जितेंद्र जाधव, शंकर चव्हाण, प्रकाश भोसले, संदीप कडू, सत्यजित रावकर, राकेश शिर्के आदी उपस्थित होते.

## तुतारी एक्स्प्रेसमधून पडून तरुण गंभीर

**रोहा :** तुतारी एक्स्प्रेसमधून पडून एक तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी (दि.२) रोजी पहाटेच्या दरम्यान घडली. ओमकार राऊत (२४, रा. देवगड, जि. सिंधुदुर्ग) असे जखमी तरुणाचे नाव आहे. मुंबईहून रत्नागिरीच्या दिशेने कोकण रेल्वे मार्गाने जात असताना रोहा व कोलाडच्या दरम्यान गुरुवारी पहाटे ३:३० वा. च्या सुमारास आल्यावेळी तुतारी एक्स्प्रेसमधून पडून हा अपघात झाला. या घटनेनंतर त्याच्यासोबत असलेल्या मित्रांनी ही माहिती माणगाव आरपीएफ यांना दिली. सदर घटनेची माहिती समजताच रोहा पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच बाहे गावाचे पोलीस पाटील व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेची टीमने रोहा ग्रामीण रुग्णालय येथे उपचारार्थ दाखल केले.

## तीन बांगलादेशींना अटक

**पनवेल :** तालुका पोलिसांनी ठोंबरेवाडी येथील सोलासीया प्रकल्पाशेजारून तीन बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले असून, कामगार म्हणून ते पनवेलमध्ये काम करत होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तालुक्यातील ठोंबरेवाडी येथून या तिघांना ताब्यात घेतले. मोहम्मद इमादुल अनवर हुसेन, मसूद बबलू मंडल, शकील सैदुल शेख यांची पोलिसांनी चौकशी करुन या तिघांना ताब्यात घेतले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी **मौजे कोठींबे,** ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक **१) श्री. दिपक प्रेमनाथ शेठ २) सौ. रामेश्वरी दिपक शेठ** यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं | प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| १४० | १ | २५-५८-०० | २५५-८० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०१/२०२५
**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९९४१८५२

दिनांक: ०२/०१/२०२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळवण्यात येते की, आमचे अशिल श्री. अकरार रियाज अहमद खान, रा. प्लॉट नं. ६४, सेक्टर नं.१, घणसोली, नवी मुंबई, ता. जि. ठाणे यांनी मौजे लोहोप तालुका खालापुर जि. रायगड येथील खाली नमुद केलेली जमिन मिळकत त्यांचे विद्यमान मालक मे. महाराष्ट्र इंडस्ट्रीज तर्फे श्री.मेहमुद अहमद चौधरी, कार्या-४०६, नवीन व्दारकापुरी बिल्डींग, एसबीएस मार्ग, शितल सिनेमा जवळ, कुर्ला वेस्ट, मुंबई-४०० ०७० यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे लोहोप, तालुका खालापुर जि. रायगड**

| अनु.क्र. | सर्व्हे क्र./हिस्सा क्र . | क्षेत्र आर.चौ.मी. |
|---|---|---|
| १. | ५६/५४ | १४-३९-०० (१४३९.०० चौ.मी) |

सदर जमिन मिळकती निर्वेध असल्याची हमी वर नमुद विद्यमान मालक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार फरोक्तखत गहाण दान बक्षीस चार्ज, अटॅचमेंट, लीन भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिल सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :
**ॲड. कालिदास सु.पोटे**
वकील उच्च न्यायालय
कार्या- नं. ३४, तळमजला, वेल्फेअर चेंबर,
भूखंड नं.७३. सेक्टर-१७, वाशी,
नवी मुंबई- ४००७०३. मो. नं. ९८३३५२५१५१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींचे टायटलबाबत खातरजमा करण्याचे काम आमचे अशिलांनी आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि.रायगड**

| भूमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | पो.ख (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १३०/३ | ०-०५-०० | ०-००-१० | ३.०९ | श्रीमती रूपाली विनय सासवडकर |

वरील वर्णनाची बागायत मिळकत, त्यामधील विहीर व ग्रामपंचायत रेवदंडा मालमत्ता क्र.२१३७ क्षेत्र २२५ चौ. फूट झोपडीवजा घरासह दरोबस्त मिळकत या जाहीर नोटीसचा विषय असून सोईकरीता तिचा एकत्रितपणे संदर्भित मिळकत असा उल्लेख करण्यात येत आहे.

तथापि संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, बयाणापावती, मृत्यूपत्र, अन्नवस्त्र, पोटगी, जप्ती, लिज, जामीनकी, कुळ हक्क, कब्जा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू., करार, ताबेकब्जा वहिवाटी, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार / हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, अधिकार नाही असे समजून, गृहित धरून टायटल रिपोर्ट दिला जाईल. या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. ०३/०१/२०२५
सही/-
**ॲड. राकेश पुंडलिक लाडे**
'श्रीकृपा', भाऊ साहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
फोन नं. ७७९८५९९९६०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक राजेश पांडुरंग मोरे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे-मोठे वेणगाव तालुका-कर्जत जिल्हा-रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन के व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र(हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७३/६ | एकुण क्षेत्र ०-०८-०० हे आर पॉ | १-४४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास इरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०३/०१/२०२५ खरेदीदारा तर्फे वकील **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

### जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय रायगड, महाराष्ट्र शासन

**खरीप पणन हंगाम २०२४-२५ व २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धान/सीएमआरच्या वाहतुकीचे दर निश्चतीसाठी ई-निविदा सूची**

जिल्हाधिकारी रायगड, महाराष्ट्र शासन, अनुभवी निविदाधारकांना स्पर्धात्मक बोली प्रस्तावांना प्रक्रीयेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करत आहेत.

तपशिलवार निविदा दस्ताऐवजासाठी इच्छुक बोलीदारांनी http://www.mahatenders.gov.in व www.raigad.gov.in. या वेबसाईटवर भेट द्यावी.

निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे. निविदा फॉर्म विक्री निविदेत सहभागी होण्यासाठी संगणकीय नोंदणी करुन आवश्यक कागदपत्र अपलोड करण्याचा कालावधी दिनांक ०३/०१/२०२५ ते दि. २३/०१/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यत पर्यत आहे.

सही/-
**(किशन ना. जावळे)**
**अध्यक्ष**
**वाहतूक दर निश्चिती जिल्हास्तरीय समिती**
**तथा**
**जिल्हाधिकारी रायगड**
**क्र. जिमाका/राअ/जाहि./१९६/२०२४-२५**

दिनांक : ०३ जानेवारी २०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| शिवाजी कृष्णा म्हसे | ५२ | ३ | ०-२२-३० | २-२५ |
| | ५६ | २३ | ०-२४-०० | ०-२२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक : ०३/०१/२०२५
मो. नं. ९१५८२७७७२८

## निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

**रायगड :** जिल्हा उद्योग केंद्रामार्फत जिल्ह्यातील निर्यात प्रचालन कार्यशाळा सोमवारी ६ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग येथे आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या यांनी दिली. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या निर्देशानुसार राज्यामध्ये निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी आणि निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनवण्यात येणार आहे. निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये निर्यात प्रचालन कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. या कार्यक्रमास सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यात संबंधित कामकाज करणारे घटक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या यांनी केले आहे.

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनिय कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | आकार इलाईट तर्फे भागीदार श्री.सचिन पटेल..शॉप नं. ३६, हरिओम हेरिटेज प्लॉट नं.८. सेक्टर-२१. खारघर. | ०१ सप्तपर्णी व ०१ काटेसावर अशी एकुण ०२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भूखंड क्र.१८ ए. सेक्टर-२१,खारघर येथे फुटपाथवरील ०२ झाडे हे वाहने आत बाहेर करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

Signed by
Swarup Manik Kharage
Date: 02-01-2025 15:58:58
**सहा. आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)**
**पनवेल महानगरपालिका**

### MAHATRANSCO — E –TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website** https://srmetender.mahatransco.in **for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000033093** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-32/ 2024-2025.** RFx e-tender for work of replacement of existing Earth wire at 220/100/22kVApta, Bombay Dyeing and 100kV Patalganga Substation under EHV (O&M) Division Panvel. **...2nd call** **Tender amount Rs. 19,20,318/-, EMD amount Rs. 19,203/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **02.01.2025, 18:00 Hrs. to 13.01.2025, 10:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 13.01.2025 up to 10:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **13.01.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली जमिनीची मिळकत तिचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. प्रकाश विष्णू साळूंखे व श्रीम. पार्वतीबाई विष्णू साळूंखे, दोघेही राहणार-मौजे दूरशेत, शेमडी, ता. खालापूर, जि. रायगड यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन येणेप्रमाणे -

**मौजे दूरशेत, ता. खालापूर, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रू.पै. |
|---|---|---|
| ५४/१/ब | ०.३७.९० | २.५९ |
| | पो.ख. ०.१२.३० यापैकी २० गुंठे | |

येणेप्रमाणे जमिनीची मिळकत तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध सुध्दा हा या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, खरेदीखत, ताबा, कुळवहिवाट, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, लीज, चार्ज, बोजा, वगैर कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असे समजून योग्य ती कायदेशीर प्रकिया पूर्ण करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी कळावे.

दिनांक : ०३/०१/२०२५
पत्ता : पाल टॉवर भिसेगाव ता. कर्जत जि. रायगड
मो. ९३०७८८५७११.
खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. यज्ञेश अ. भागवत**
(बी.ई.एल.एल.बी.)

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सावळे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री. ज्वालाप्रसाद चौथीराम मिस्त्री | ९४ | १५ | १-५८-०० | १ | ०७ |

पैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र हे आर-पॉ ०-५७-०० इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- फ्लॅट नं. १०१, पहिला मजला,
कोर्ट व्ह्यु अपार्टमेंट, कर्जत कोर्ट समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.
सही/-
**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
दिनांक :- ०३/०१/२०२५
मो. नं. ९६०४५४५७७७
ई मेल:- Sandeep.m0444@gmail.com

## निवडक



### बच्चे कंपनीने अनुभवला नौकानयनाचा थरार

**उरण :** यॉटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने ७ ते १५ वयोगटातील मुलांसाठी नौकानयनाच्या खेळाची ओळख करून देण्याच्यासाठी सहा दिवसांचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. उरण येथील समुद्र किनाऱ्यावर आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात २५ मुलांनी समुद्रातील नौकानयनाच्या थराराचा अनुभव घेतला. यॉटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या या उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्रातील नाविकांची एक नवीन पिढी तयार करणे, सर्व पार्श्वभूमीतील मुलांसाठी खेळाचा एक व्यवहार्य पर्याय म्हणून प्रचार करणे हा आहे. तरुण उत्साही लोकांना शिकण्यासाठी आणि वाढण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देऊन यॉटिंग असोसिएशन भारतीय नौकानयनात उज्ज्वल भविष्याचा मार्ग मोकळा करत आहे. २५ ते ३१ डिसेंबर दरम्यान उरण बीचवर मुलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या सहा दिवसीय नौकानयन शिबिरात ७ ते१५ वयोगटातील उत्साही मुलांनी उदंड प्रतिसाद दिला. या आयोजित शिबिरात नौकानयनाच्या खेळाची ओळख करून देण्यात आली.



### मंगेश पाटील यांचे पेण वरसई पंचक्रोशीत जल्लोषात स्वागत

**पेण :** भारतीय सैन्यदलातील सेवा पूर्ण करुन पेण वरसई पंचक्रोशीतील आष्टे गावातील जवान मंगेश जगन्नाथ पाटील यांच्या आगमनाची आतुरतेने वाट पहात होते. जवानाने पेणच्या भूमीवर पाय ठेवताच भारत माता की जय या घोषणांनी वरसई पंचक्रोशीतील जनतेने जवान मंगेश पाटील आणि भारतीय सैन्यदलातील जवानांचा जय जय कार केला. वरसई फाटा ते वरसई आणि पुढे आष्टे गाव अशी पाच किलोमीटर अंतरावरची ही वीर जवानांची शोभा यात्रा फटाके वाटेत होणारे स्वागत हा नेत्रदीपक सोहळा बुधवारी सायंकाळी स्थानिक जनतेने याची देही याची डोळा अनुभवला आणि भारत मातेचा जयकारा केला.पेणचा आष्टे गावचा हा तरूण सैन्यदलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगून होता. ती संधी मंगेश पाटील यांना सन २४ सप्टेंबर २००८ रोजी मिळाली. आष्टे गावचा तरुण सैन्यदलात भरती झाला आणि बघता बघता १७ वर्षे त्यानी देशाच्या सिमांचे रक्षण जम्मू काश्मीर, जयपूर राजस्थान आसाम मध्यप्रदेश दिल्ली आणि आता शेवटी लद्दाख सिमेवर कर्तव्य बजावून काल ते सन्मान पूर्वक सैन्यदलाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले.



### पनवेलमध्ये मसाला दूध वाटप

**पनवेल :** शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्या वतीने कळंबोली येथे ३१ डिसेंबर रोजी मसाला दूध वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो नागरिकांना दुधाचे वाटप करण्यात आले. ३१ डिसेंबरच्या दिवशी अनेक जण मद्यपान करून वाहन चालवतात. त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. या ३१ डिसेंबरच्या दिवशी नागरिकांनी नियमांचे उल्लंघन करू नये आणि कधीही मद्य पिऊन वाहन चालवू नये असे आवाहन वारंवार करण्यात येते. ३१ डिसेंबर हा आपला सण नाही. आपला नवीन वर्ष गुढीपाडव्याच्या दिवशी असतो. ३१ डिसेंबरच्या दिवशी शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्या वतीने दरवर्षी मसाला दुधाचे वाटप करण्यात येते. यावर्षीचे हे तेरावे वर्ष होते. यावेळी अनेक नागरिकांना मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. दूध वाटपवेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

### ख्रिश्चन बांधवांची संत फ्रान्सिस झेवियर तीर्थक्षेत्राला भेट

**रेवदंडा :** अलिकडे त्याच त्या गाड्यातून विरंगुळा म्हणून प्रत्येक जण आपापल्या परीने फिरायला जात असतो काही जण गड-किल्ले, किनारे,जंगल भटकंती तर काहींचा ओढा धार्मिक स्थळांना, कृषी दौरा शेतकरी, बागायतदार करतात. गोवा म्हटले की मौज-मजा आणि निळ्याशार समुद्रकिनारी आनंद लुटण्याचे ठिकाण असे चित्र नजरेसमोर उभे राहते. परंतु अलिबाग तालुक्यातील कोर्लई येथील ख्रिश्चन बांधवांसाठी जुना गोवा हा तिर्थक्षेत्रापेक्षा कमी नाही.कोर्लईमधील ख्रिश्चन बांधवानी संत फ्रान्सिस झेवियर तीर्थक्षेत्र या जुन्या वास्तुला भेट दिली.

सुमारे ४७२ वर्ष संत फ्रान्सिस झेवियर यांचे शव पेटीत ठेवलेले असून दर दहा वर्षांनी नोव्हेंबर ते ५ जानेवारीपर्यंत दर्शनासाठी खुले असते. या ठिकाणी भारतातील, जगभरातील पर्यटक या ठिकाणी भेट देतात. त्या धर्तीवर जुना गोवा येथे जाऊन दर्शनाचा लाभ घ्यायचा हा हेतु ठेवला, अशी माहिती कोर्लईमधील माऊंट कार्मेल चर्चचे प्रमुख धर्मगुरू फादर बोनावेंचर नुनीस यांनी दिली. सिस्टर जोयाना, फ्रॅसिसका व २६ अन्य महिला पुरुष या ख्रिश्चन बांधवानी अध्यात्मिक भेटीचा लाभ अनुभवला. या स्थळाला भेट देण्याची इच्छा होती, असे फादर नुनीस यांनी स्पष्ट केले. एक तर दर दहा वर्षांनी हा योग येतो, असेही त्यांनी सांगितले.

सन १५४२ मध्ये त्या कालावधीत अलिबाग तालुक्यातील काही बंदर ही खूप प्रसिद्ध होती. त्यामध्ये प्रामुख्याने चौल येथील बंदराचा समावेश होता. चौलमधील आगरकोट किल्ला आजही इतिहासाची साक्ष देत आहे. याच आगरकोट किल्ल्यामध्ये दोन दिवस संत फ्रान्सिस झेवियर यांनी वास्तव्य केले होते, असे दाखले उपलब्ध आहेत. आता तो भाग रेवदंडा म्हणून सुपरिचीत आहे. त्यामुळे ख्रिश्चन बांधवांसाठी जुना गोव्याला जाणे ही एक पर्वणीच होती, असे म्हटल्यास वावगे ठरणार आहे.

## स्थानिकांसह पर्यटकांनी अस्वच्छतेबाबत व्यक्त केली नाराजी

# अलिबाग आगार बनले कचरा डेपो

| अलिबाग | प्रमोद जाधव |

अलिबाग एसटी बस स्थानकामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याचा ढिगारा पडून आहे. नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी अलिबागमध्ये दाखल झालेल्या पर्यटकांसह स्थानिक प्रवाशांनी स्थानकातील अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त केली आहे. पर्यटन व ऐतिहासिक तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अलिबागमधील कचऱ्याबाबत अनेकांनी नाक मुरडले. याकडे एसटी बस आगार व्यवस्थापक गांभीर्याने लक्ष देतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एसटी बस आगार व स्थानक आहे. अलिबाग एसटी बस आगारात ६३ हून अधिक एसटी बसेस आहेत. रोहा, पनवेल, मुरूड, कर्जत, खोपोली, पुणे, मुंबई, शिर्डी, नाशिक अशा अनेक ठिकाणी एसटी बसेस जातात. एसटीतून प्रवास करणाऱ्याची संख्या प्रचंड आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आदी प्रवासी एसटीतून नियमीत प्रवास करतात. अलिबाग स्थानकात प्रवाशांची कायमच वर्दळ राहिली आहे. अलिबाग पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने या ठिकाणी येणाऱ्यांची संख्यादेखील वाढू लागली आहे. नाताळ व थर्टी फर्स्टच्या निमित्ताने पर्यटक रायगड जिल्ह्यात आले. मात्र अलिबाग एसटी बस स्थानकात कचऱ्याचा ढिगारा पाहून अनेकांनी अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त केली. अलिबाग स्वच्छ शहर म्हणून ओळखले जात असताना स्थानकात असलेल्या कचऱ्याबाबत नाकच मुरडले. अलिबाग स्थानकात गेल्या अनेक दिवसांपासून हा कचरा पडून आहे. परंतु तो कचरा काढून परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत आगारातील प्रशासकीय यंत्रणा उदासीन ठरली आहे. हा कचरा तातडीने काढण्याची मागणी प्रवाशी वर्गाकडून होत आहे.

> सीएनजी पंपाचे काम सुरु होते. त्यामुळे तो कचरा पडून आहे. कचरा काढण्यासाठी यंत्रणा राबविण्यात आली होती. परंतू कचऱ्याची वाहतूक करणारे ट्रॅक्टर न आल्याने स्थानकात कचरा पडून आहे. नगरपरिषदेच्या मदतीने हा कचरा लवकरात लवकर काढण्याचा प्रयत्न केला जाईल.
> – राकेश देवरे, व्यवस्थापक अलिबाग एसटी



### बसेस वेळेवर सोडण्याचा प्रयत्न राहणार

**अलिबाग स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी एसटी बस आगारामार्फत तयारी केली जाणार आहे. स्वच्छतेबरोबरच एसटी बसेस वेळेवर सोडण्याचा मानस आहे. खड्डेमय रस्त्यांमुळे बसेस रस्त्यात बंद पडतात. बसेसमध्ये बिघाड होणार नाही, याची दक्षता घेतली जाणार आहे. यावर्षात त्या पध्दतीने नियोजन करण्यात येणार आहे. त्या पध्दतीने कामकाज करण्याचा प्रयत्न आहे, असे आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांनी सांगितले.**

## एसटीच्या चालक – वाहकांना प्रोत्साहन भत्ता

| रायगड | प्रतिनिधी |

एसटी महामंडळाने उत्पन्न वाढीसाठी नवीन वर्षात प्रोत्साहन भत्ता योजना राबविण्याचे ठरविले आहे. या योजनेंतर्गत चालक – वाहकांसाठी १ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत प्रायोगिक तत्त्वावर उत्पन्नावर आधारित प्रोत्साहन भत्ता देण्याचे ठरविले आहे. वाढीव उत्पन्नावर चालक वाहकांना कमिशन देण्यात येणार असल्याची माहिती विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी दिली. या योजनेमध्ये प्रत्येक क्रू ड्युटीचे निव्वळ वाहतूक उत्पन्न जानेवारीच्या उत्पन्नावर आधारित उद्दिष्ट काढण्यात येणार आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करून त्यापेक्षा जास्त वाढीव उत्पन्न आणले तर वाढीव उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम ही प्रोत्साहन भत्ता म्हणून चालक-वाहक यांना समप्रमाणात तत्काळ रोखीने देण्यात येणार आहे.

### अशी असेल योजना

**ही योजना अमलात आणण्यासाठी उद्दिष्ट उत्पन्न निर्धारित करण्यात येणार असून उद्दिष्टापेक्षा अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रोख रक्कम मिळणार आहे. ड्युटीचे उद्दिष्ट उत्पन्न दहा हजार रुपये असेल. जास्त मिळालेल्या दोन हजार रुपयांच्या उत्पन्नावर २० टक्के म्हणजेच चारशे रुपये प्रोत्साहन भत्ता कर्मचाऱ्यांना मिळेल. यामध्ये दोनशे रुपये चालकाला तर दोनशे रुपये वाहकास असे दोघांना सम प्रमाणात रोखीने देण्यात येणार आहे.**

## गाडीच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव इनोव्हा गाडीची धडक पादचाऱ्याला बसल्याने त्यात तो गंभीररित्या जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

पनवेल-गोवा महामार्गावरील जेडब्ल्यूसी गेटसमोर भरधाव इनोव्हा गाडी घेवून जाणारा चालक कमल यादव याने पादचारी राजेंन दमेनबा मोनाशी (५७) याला धडक दिल्याने तो गंभीररित्या जखमी होवून मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## फसवणूक प्रकरणातील आरोपीला पोलीस कोठडी

| पनवेल | वार्ताहर |

नामांकित बांधकाम व्यावसायिक तुकाराम दुधे यांना केलेल्या ५५ लाख २९ हजार रुपयांच्या फसवणूक प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अकोला बाळापूर येथे जावून आरोपीच्या मुसक्या आवळल्या होत्या. सदर आरोपीला पनवेल न्यायालयात हजर केले असता ७ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

फजल रहेमान गुलाब नबीब अन्सारी याने महाजनकोच्या पावत्या दाखवून तुकाराम दुधे यांची फसवणूक केली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ, पो. हवा.अतुल देवकर व पो.शि.दत्ता जाधव आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेतला असता सदर आरोपी हा अकोला बाळापूर येथे असल्याचे समजून आल्याने त्या ठिकाणी जावून सापळा रचून या आरोपीला ताब्यात घेवून पनवेल कोर्टात हजर करण्यात आले असता ७ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## शिक्षक म्हणजे भविष्य-दीपक पायगुडे

| कर्जत | वार्ताहर |

प्रत्येकाला वाटते आपला मुलगा सन्मार्गाला जावा, संस्कारी असावा, सुदृढ असावा असे वाटते. आपल्या मुलाचे कर्तुत्व डोळे भरून पहायचे असते. शिक्षक म्हणजे भविष्य आहे. तेच विद्यार्थ्यांना घडवून वेगवेगळ्या विभागात कर्तृत्ववान बनवतात. शि म्हणजे शिस्त, क्ष म्हणजे क्षमता, क म्हणजे कर्तव्य अशी शिक्षकाची व्याख्या आहे. बाहेरच्या देशात शिक्षकाला खूप मान आहे. ते आले तर न्यायाधीश सुध्दा उभे राहतात, असे प्रतिपादन लोकसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक पायगुडे यांनी केले.



कर्जत तालुका विद्या प्रसारक मंडळाच्या स्वातंत्र्य सैनिक दत्तात्रेय पांडुरंग डोंबे विद्यानिकेतन प्रशालेच्या रौप्य महोत्सवी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. दीपक पायगुडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. प्रेमचंद जैन, सीताराम कांगणे, तानाजी चव्हाण, शरद भगत प्रवीण गांगल, झुलकर डाभिया, प्रदीप शृंगारपुरे, रमेश मुंढे, धनंजय बेडेकर, आदींसह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## संजय पवार यांचा पुरस्काराने सन्मान

| पनवेल | वार्ताहर |



कामगार नेते व ऑल इंडिया सिफेर्स युनियनचे अध्यक्ष संजय वासुदेव पवार यांचा आजवरच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन शिवबा विचार प्रचार प्रसारक मंडळ ट्रस्टकडून किल्ले रायगड या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा सदरेवर शिवरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले .

यावेळी कृष्णाजी पाटील, विजय खिलारे, नूतन खिलारे, वैभव घरत, नितीन गोरडे, अमर रणवरे, विठ्ठल उकिरकर, हिरकणी अवकीरकर, विजय कदम, तेजस कदम, शिवाजी बर्गे, राम शिंदे, वरूण चौव्हान, राहुल बर्गे, दिपाली गायकर, सतीश शिंदे, देवनाथ म्हात्रे, चैतन्य काळे, आशिष पवार, अजिक्य पोटूळे, रमेश विभुते, प्रियंका पाटील, प्रथमेश पाटील, गणेश रणवरे, योगेश खिलारे, समृद्धी खिलारे, पूजा वाघ, विकास वाघ, मंगेश पवार, नीता गोरडे, आराध्य गोरडे,जयश्री जाधव आदी उपस्थित होते.



मुरुड परिसरातील भातशेती आटोपली की शेतकरी भाजी कलिंगडे लावतात तर काहीजण वीटभट्टी टाकतात. वीटभट्टी हा व्यवसाय फार कष्टाचा आहे. माती मळताना खारआंबोलीचे शेतकरी. (छायाचित्र– सुधीर नाझरे)

## एसटी बसमधून डिझेलची चोरी

**पनवेल :** एसटीतून ११० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बाळकृष्ण पिंटूळे, एसटी चालक हे बस घेऊन निघाले. रात्री एकच्या सुमारास गाडी शिरूर येथून मुंबईच्या दिशेने घेऊन ते निघाले. पहाटे चारच्या सुमारास लोणावळ्यावरून कळंबोलीकडे जाताना व्हील गरम झाल्याचे आढळले. गाडीचे व्हील थंड झाल्याने ते पनवेल येथे गाडी घेऊन पोहोचले. चेंबूर नाका येथे गाडी बंद पडली. यावेळी डिझेलच्या टाकीचे झाकण उघड्या अवस्थेत व टाकी रिकामी दिसून आली.

## गोल्डन ग्रुप पनवेलच्या अध्यक्षपदी वसंत भगत

| पनवेल | वार्ताहर |

पनवेल मधील बहुचर्चित गोल्डन ग्रुप पनवेलच्या अध्यक्षपदी नुकतीच वसंत भगत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नुकत्याच झालेल्या गोल्डन ग्रुप पनवेलच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये वसंत भगत यांची सर्वानुमते अध्यक्ष पदी निवड झाली तर सरचिटणीस पदी नीलकंठ भगत उपाध्यक्षपदी अनिल नलावडे आणि खजिनदारपदी रत्नाकर पाटील यांची देखील बिनविरोध निवड करण्यात आली.

गेली वीस वर्षे सातत्याने गोल्डन ग्रुप पनवेल हा समाजकारणात अग्रेसर राहिलेला ग्रुप आहे. गोल्डन ग्रुप तर्फे आजपर्यंत तालुक्यातील अनेक आदिवासी शाळांची दुरुस्ती करण्यात आली आहे त्याचप्रमाणे येथील विद्यार्थ्यांना दप्तरे वाटप, वह्या पुस्तकांचे वाटप, तसेच गणवेश वाटप कार्यक्रम करण्यात येत असतो. त्याचबरोबर महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, आरोग्य शिबिर भरवणे असे कार्यक्रम देखील गोल्डन ग्रुप राबवीत असतो. महाराष्ट्रात येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींना सामोरे जात असताना गोल्डन ग्रुपने नेहमीच आपला मदतीचा हात आपत्तीग्रस्तांसाठी पुढे केला आहे.



अनेक वेळा गोल्डन ग्रुप तर्फे नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत करण्यात आली आहे. यापुढे देखील गोल्डन ग्रुप समाजकारणात अशाच प्रकारे सहभाग घेत राहील अशी ग्वाही यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष वसंत भगत यांनी दिली. याप्रसंगी मावळचे अध्यक्ष अमोल गवारी, प्रकाश फडके, विजय पाटील, आशुतोष पाटील, पप्पू गायकवाड आदी सदस्य उपस्थित होते.

## हॉटेलमधून ९४ हजारांची चोरी

**पनवेल :** खारघर येथील २ हॉटेलमध्ये प्रवेश करून हॉटेलमध्ये ठेवलेली एक लाख ९४ हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी चोरा विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.खारघर से-१२ येथील प्रणाम हॉटेलचे शटर उचकटून आणि कडी तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला आणि हॉटेलमधील एक लाख ४९ हजार रुपये चोरून नेले. तर सेक्टर २१ येथील उडपी श्रीकृष्ण हॉटेलमधून ४४ हजार ८५० रुपयांची चोरी केली आहे.

## लोखंड बाजारात वाहतूक चौकी

| पनवेल | वार्ताहर |

लोखंड पोलाद बाजारामध्ये पहिल्यांदा वाहतूक पोलीस ठाणे आणि चौकी सुरू करण्यासाठी भूखंड देण्याची प्रक्रिया सिडको मंडळाने सुरू केली आहे. नूकत्याच या भूखंडाची पोलीस व सिडको अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. तब्बल ४० वर्षांनी पहिल्यांदा पोलिसांसाठी या परिसरात भूखंड मिळत असल्याने येथील वाहतूक नियमन आणि सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

व्यापारी गोदामांच्या सुरक्षेसाठी आणि दळणवळणासाठी पोलीस चौकी असावी अशी मागणी व्यापाऱ्यांकडून अनेक वर्षांपासून केली जात होती. मात्र सिडको आणि पोलीस विभागामध्ये हे हस्तांतरण रखडले. नवी मुंबई पोलीस आयुक्त पदाची सूत्रे मिलिंद भारंबे यांनी हाती घेतल्यावर लोखंड पोलाद बाजारातील वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी त्यांनी बाजाराला भेट दिली. त्याच भेटीनंतर बाजारात सीसीटिव्ही कॅमेरे लावणे आणि पोलिसांसाठी स्वतंत्र चौकी बांधण्यासाठी भूखंडाच्या मागणीसाठी सिडको मंडळाकड पाठपुरावा सुरू केला.

त्यामुळे मागील आठवड्यात अडीच गुंठे क्षेत्राचे दोन भूखंड पोलिसांना देण्याच्या प्रक्रियेला वेग आला. जागा पाहणीनंतर हस्तांतरण प्रक्रियेला वेग आल्याची माहिती वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांनी दिली.

## ग्रामीण अर्थव्यवस्थेला हातभार ! पारंपारिक खाद्य संस्कृती पर्यटक आणि खवय्यांचे खास आकर्षण

# पोपटीतून पर्यटन आणि रोजगार !

| माणगाव | सलीम शेख |

रायगड जिल्हा निसर्ग समृद्धीने संपन्न आणि जैवविविधतेनेही नटलेला आहे. रायगडच्या निसर्ग सौंदर्याबरोबरच रायगड मध्ये बहरत असलेली पारंपारिक खाद्य संस्कृती पर्यटक आणि खवय्यांचे खास आकर्षण ठरत आहे.

रायगडच्या मातीत रब्बी हंगामात होणारी कडधान्य शेती आणि या कडधान्य शेतीमध्ये वाळाची मोठ्या प्रमाणात लागवड ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारी ठरत आहे. वाळाची शेती अलीकडच्या काळात शेतकऱ्यांना अर्थार्जनाचे मोठे साधन होत असून वालाच्या शेंगांची पोपटी ग्रामीण तसेच शहरी नागरिकांच्या आकर्षणाचा विषय ठरत आहे. हिवाळा म्हणजे उबदार कपडे आणि शेकोटी त्याबरोबरीने पोपटी पार्टी असे एक समीकरण सर्वत्र रूढ होत आहे. पोपटी पार्टीच्या या प्रकाराला तरुण, तरुणी, अबालवृद्ध पर्यटकांची तसेच स्थानिकांची पसंती मिळत आहे.



थंडीच्यादिवसात या वालाच्या शेंगांची पोपटी लावण्याची परंपरा असून पोपटीच्या शेंगा खवय्यांच्या पसंतीस उतरतात. मागणीचा विचार करून पर्यटनातील संधी ओळखून जिल्ह्यातील काही तरूणांनी पर्यटक व स्थानिक खवय्यांना आकर्षित करण्याच्या उद्देशाने ङ्गपोपटीफ लावून देण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. शेतातील वालाच्या शेंगा व इतर साहित्य यातून हि पोपटी पर्यटकांसाठी व खवय्यांसाठी तयार करून दिली जाते.

गेल्या वर्षी प्रायोगिक स्तरावर हा प्रयोग राबवून या वर्षी स्थानिक तरूण पर्यटकांना पोपटीच्या माध्यमातून आकर्षित करण्याच्या तयारीत आहेत.शाकाहारी व मांसाहारी अशा दोनही स्वरूपात सदरची पोपटी करून मिळणार असून शाकाहारी पोपटीत शेंगा, बटाटी, कांदे इत्यांदींचा समावेश असेल तर मांसाहारीमध्ये चिकन, अंडी, बटाटी इत्यादी पदार्थांचा सम ावेश असणार आहे.शाकाहारी पोपटी ७०० ते ८०० रूपयांना तर मांसाहारी पोपटीसाठी ८०० ते ९०० रूपये देवून ठरविलेल्या प्रमाणात सदरची पोपटी करून मिळणार आहे. पोपटीसाठी मातीचे मडके घेतले जाते. या मडक्यामध्ये शेतात मिळणाऱ्या बांभरुड ही वनस्पती तळात गोलाकार लावली जाते. नंतर यामध्ये वालाच्या शेंगा, चवीनुसार मीठ, ओवा, अंडी, मसाला लावलेले चिकन टाकले जाऊन मडक्याचे तोंड वाळाच्या पाल्याने किंवा बांभरुडांनी बंद केले जाते. मडक्याला शेणी, लाकूड किंवा पेंढा यामध्ये पंधरा ते वीस मिनिटे उष्णता दिली जाते. चांगली उष्णता मिळाल्यास पंधरा मिनिटांमध्ये पोपटी खाण्यास तयार होते.

> **वाळाच्या शेंगा तयार झाल्यानंतर पोपटीचा हंगाम सुरू होतो. मुंबई, पुण्यासारख्या शहरातून तरुणांबरोबर जेष्ठ नागरिकांना याचे आकर्षण आहे. अत्यंत चवदार अशा शेंगा व त्यामध्ये खरपूस असे भाजलेले चिकन, अंडी यांची लज्जत न्यारी असते. कोकणातील ही खाद्य परंपरा अलीकडे प्रसिद्ध होत असून खवय्यांची पसंती मिळत आहे. यातून स्थानिकांना चांगला रोजगार मिळत आहे. वालाच्या शेंगा व त्यातून मिळणारे उत्पादन हे स्थानिकांना रोजगाराचे एक साधन म्हणून उपलब्ध होत आहे. पर्यटनाच्या दृष्टीने यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.**
> **नयन पोटले, पोपटी आयोजक.**

# वाऱ्यावरची वरात

गेले वीस दिवस महाराष्ट्रात ज्याच्या नावाचा गजर चालू आहे तो वाल्मिक कराड अगदी आरामात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीमध्ये पोलिसांपुढे हजर झाला. इतकी असंख्य दहशतवादाची आणि चोरी-दरोड्यांची प्रकरणे हाताळणाऱ्या महाराष्ट्र पोलिसांना वाल्मिक सापडत नव्हता. या पोलिस खात्याचे मुख्य सरदार साक्षात मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस. त्यांनी काल-परवाच राज्यातला नक्षलवाद संपवण्याची घोषणा केली. पण इतके कार्यक्षम गृहमंत्री असूनही त्यांच्या पोलिसांना बीड जिल्ह्यातला सर्वपरिचित राजकीय इसम कुठेही आढळून येत नव्हता. तो पाताळात दडला की हवेत उडून गेला असेच वाटू लागले होते. पण प्रत्यक्षात तो बीडपासून अडीचशे किलोमीटर अंतरावर आणि देवेंद्रांच्या मुंबईपासून तर त्याहून कमी अंतरावर असलेल्या पुणे शहरातच सापडला. त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला तेव्हा तो पुण्यातच होता. संतोष देशमुख याचा खून झाला तेव्हा देवदर्शनाला निघून गेलेला होता. मग उज्जैन, तिरुपती, कर्नाटकातले कुठल्या कुठल्या देवांना दर्शन देत तो हिंडत होता. इकडे महाराष्ट्रातले तमाम राजकारणी, मिडिया त्याच्या नावाने ओरडत होता. त्याच्या विरोधात बीडमध्ये एक महामोर्चा देखील निघाला. देशभरातील टीव्ही चॅनेल्सनी तो दाखवला. बीडचा वाल्मिक कराड देशभरात फेमस झाला. तरीही त्याला इतक्या राज्यांच्या प्रवासात कोणीही ओळखले नाही यावरूनच तो किती शक्तीशाली असेल याची कल्पना यावी. त्याला आता १५ दिवसांची कोठडी मिळाली आहे. मात्र त्याच्याविरुध्द उभे राहण्यास आधी कोणी सरकारी वकीलच तयार नव्हते अशाही बातम्या आहेत. असा वाल्मिक कराड एका दिवसात जन्माला येत नाही. वर्षानुवर्षे तो वावरत असतोच. एखाद्या संतोष देशमुखच्या खुनाचा फार गवगवा होतो आणि त्याला अटक करावी लागते. वाल्मिक गोपीनाथ मुंडे यांच्या जवळचा होता. नंतर धनंजय मुंडे यांच्या जवळ गेला. म्हणजे भाजप आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांना त्याचा उपयोग झाला असणार. गेली जवळपास दहा वर्षे देवेंद्र फडणवीस गृहमंत्री आहेत. त्यांनाही याच्या कारवाया ठाऊक असणार. पण या सर्वांचा सध्याचा आविर्भाव असा आहे की वाल्मिकचे नाव ते पहिल्यांदाचा ऐकत आहेत.

### पवनउर्जेतील पैसा

या प्रकरणाच्या निमित्ताने विकासाचे राजकारण काय असते याचाही पर्दाफाश झाला आहे. बीड हा दुष्काळी जिल्हा. तिथले सुमारे सहा लाख मजूर ऊस तोडण्यासाठी अन्य जिल्ह्यात जातात. यांच्यात बहुतांश वंजारी आहेत. गोपीनाथ मुंडे यांच्या निमित्ताने यांना नेता मिळाला. ओबीसी आरक्षणाचा फायदा मिळून अनेक जण पोलिस व सरकारी नोकरीत गेले. याचा एकत्रित परिणाम म्हणून वंजारी समाजाची बीडच्या राजकारणावर मजबूत पकड निर्माण झाली. मराठा व इतर जातींना ते भारी पडू लागले. रस्त्यांची व इतर सरकारी कंत्राटे, शेती ही त्यांना पुरेशी पडेनात. त्याच वेळी नेमका हा पवनचक्क्यांचा उद्योग पुढे आला. अपारंपरिक उर्जेसाठी केंद्र आणि राज्य सरकारची अनेक अनुदाने आहेत. वारा (पवनचक्की) आणि सूर्य (सौरउर्जा) यांच्या आधारे वीज निर्माण करण्याला सध्या भलताच भाव आलेला आहे. ही वीज राज्य वीज मंडळ विकत घेते. त्याला कच्चा माल नैसर्गिक व फुकट आहे. पहिल्या गुंतवणुकीसाठी सरकार अनुदाने देत असतेच. सत्तारुढ लोकांच्या जवळ राहून त्यांचा फायदा उठवता येतो. नंतर जी काही वीज निर्माण होईल त्यातून फायदा मिळू शकतो. अनेक जण काळा पैसा पांढरा करण्यासाठीही याचा उपयोग करतात. एका पवनचक्कीच्या उभारणीतून दरवर्षी १३ ते १५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते असे म्हणतात. तोटा झाला तरी तो काळ्या पैसा जिरवायला उपयोगी ठरतो. अशाच गणिताच्या आधारे बीड जिल्ह्यात तीनशेच्या वर पवनचक्क्या उभ्या राहिल्या आहेत. त्यात राजकारणी मंडळीची भागीदारी आहे. या चक्क्या ज्या शेतकऱ्यांच्या जमिनींमध्ये आहेत त्यांना पुरेसा मोबदला न देणे, किंवा अजिबातच न देणे, धमकावून त्यांच्या जमिनी बळकावणे असे अनेक प्रकार आता समोर येत आहेत चक्क्या  पवनचक्क्या. दुसरीकडे प्रतिस्पर्धी पक्षाच्या वा गटाच्या चक्क्या उभारणाऱ्या कंपन्यांकडून खंडणी वसूल करण्याचे प्रकारही वाढले. संतोष देशमुख यांचे प्रकरण त्यातलेच आहे.

### हा पर्दाफाश करणार कोण?

मस्साजोगमधील पवनचक्कीवाल्या कंपनीकडून वाल्मिकच्या माणसांनी दोन कोटी रुपये खंडणी मागितली. कंपनीला देशमुख व गावकऱ्यांचे संरक्षण होते. त्यांना कंपनीकडून नक्कीच लाभ झालेला असणार. त्यामुळे हा मुख्यतः दोन गटांमधील संघर्ष होता. तो खुनामुळे अचानक चव्हाट्यावर आला. या पवनचक्क्यांमुळे कंत्राटदार व व्यापारी यांचे भले झाले. मात्र स्थानिक शेतकऱ्यांना त्यात नेमका किती फायदा झाला हे तपासण्याची गरज आहे. गावागावातील उनाड पोरांना खर्चापुरते पैसे देऊन या कंत्राटदार, खंडणीखोर आणि व्यापारी मंडळीनी आपल्या पदरी ठेवले आहे. हेच लोक एरवी राजकीय पक्षाचे कार्यकर्ते म्हणून वावरतात. मराठा आरक्षण असो की ओबीसींचे मोर्चे यात हीच मंडळी गाड्या घेऊन हजर राहतात. देशमुख हत्येचा मुद्दा तापल्यानंतर बीडचा मोर्चा काढणाऱ्यांमध्ये हेच होते. दुसऱ्या बाजूने वाल्मिकला अटक झाल्यावर त्याच्या समर्थनार्थ न्यायालयात जमलेल्यांमध्येही या असल्याच टपोरी गुंडांचा समावेश होता. सध्या विकासाचे राजकारण म्हणून सांगितले जाते ते हेच आहे. यात खरा विकास होतो तो राजकारणी, कंत्राटदार आणि त्यांच्या भोवतीने वावरणारी तरुणांची टोळकी यांचा. सामान्य शेतकरी, शेतमजूर यांच्या हाती काहीही लागत नाही. या टोळक्यांमध्ये कधी तरी टोळीयुध्द होते. त्याकडे भीतीने व अचंब्याने पाहणे हेच सामान्य लोकांचे काम उरते. बीड जिल्ह्यात गेल्या काही काळात १०२२ शस्त्र परवाने दिले गेले. त्यावर बरीच टीका झाल्यावर आता ते परत घेण्याची कारवाई चालू आहे. पण मुळात एका जिल्ह्यात इतक्या मोठ्या प्रमाणात बंदूक वा पिस्तुलाचे परवाने दिलेच कसे गेले याचा मुळापासून तपास व्हायला हवा. तो कधीच होणार नाही. वारकरी दिंड्यांमध्ये सक्रीय असलेल्या काही हरिभक्तांकडेही हे शस्त्रपरवाने आहेत असे म्हणतात. उद्या पंढरपूरच्या दिंडीत भांडणे झाली तर पिस्तुलाचे बार निघतील असा याचा अर्थ आहे. असो. देशमुख हत्येच्या निमित्ताने पवनचक्यांनी बीडमधील राजकारणाची कशी वाऱ्यावरची वरात काढली आहे ते समोर आले. त्या पार्श्वभूमीवर, एकूण राज्यातील पवनचक्क्या, सौरउर्जा इत्यादी प्रकल्पांची काळी बाजू लोकांसमोर आणण्याची गरज आहे. पण खुद्द राज्यकर्तेच या वरातीत सामील असल्याने ते करणार कोण हा खरा प्रश्न आहे.

## विचार

# लढवय्या गोलंदाज!

**रवीचंद्रन अश्विनने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान अचानक निवृत्तीची घोषणा करून चाहत्यांना धक्का दिला. संघाला गरज उरली नसेल तर निरोप घेतलेला बरा, असा विचार त्याने केला. भारतीय फिरकीचा आधारस्तंभ बनून अश्विनने भारतीय क्रिकेटची मनोभावे सेवा केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली असली तरी एक महान फिरकी गोलंदाज म्हणून अश्विन नेहमीच स्मरणात राहील.**

श्रीशा वागळे

फिरकी गोलंदाजी ही एक कला आहे आणि ही कला जपणारा एक उत्तम कलाकार म्हणजे रविचंद्रन अश्विन. अश्विन आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला आहे. ऑस्ट्रेलियामध्ये कसोटी मालिका सुरू असताना त्याने तडकाफडकी निवृत्तीची घोषणा केली. त्याच्या निवृत्तीमुळे भारतीय क्रिकेटमधला फिरकीचा एक अध्याय संपला आहे. अश्विनने भारतीय क्रिकेटमध्ये भरीव कामगिरी करून ठेवली आहे. त्याने दिलेले योगदान कोणीही नाकारू शकणार नाही. अश्विनला अन्य खेळाडूंप्रमाणे फारसे वलय लाभले नसले तरी त्याने मैदानावर अगदी चोख कामगिरी बजावली. त्याने कोणत्याही स्टारडमची अपेक्षा ठेवली नाही. तो निरपेक्ष वृत्तीने खेळत राहिला. आपल्या शिरपेचात मानाचे तुरे खोवत राहिला. गोलंदाजीसोबतच फलंदाजीतही योगदान देत राहिला. तसे पहायला गेले तर भारत ही फिरकी गोलंदाजांची भूमी. या मातीने एकापेक्षा एक फिरकी गोलंदाज दिले. बेदी, प्रसन्ना आणि चंद्रशेखर हे भारताचे फिरकी त्रिकूट तर त्यांच्या काळात फलंदाजांना चकवून चारी मुंड्या चीत करायचे. त्यानंतर अनिल कुंबळे भारताचा हुकमी एक्का बनला. त्यानेही एक काळ गाजवला. कुंबळेच्या पावलावर पाऊल टाकत हरभजन सिंग आला. त्यानेही फिरकीच्या तालावर फलंदाजांना नाचवले. मधल्या काळात बरेच फिरकी गोलंदाज भारतीय संघात आले आणि गेले. मात्र रवीचंद्रन अश्विन सगळ्यांमध्ये उजवा ठरला. त्याने भारतीय संघातले स्थान राखलेच, पण वेळोवेळी स्वत:ला सिद्धही केले. प्रसंगी तो संघाबाहेरही बसला. अश्विनने नेहमीच संघहिताला प्राधान्य दिले. कसोटी सामन्यांमध्ये मिळवलेले ५३७ बळी त्याची महानता अधोरेखित करण्यासाठी पुरेसे आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी मिळवणाऱ्या



गोलंदाजांच्या जागतिक यादीत अश्विनचा चौथा क्रमांक लागतो. त्याच्या पुढे फक्त मुथय्या मुरलीधरन, शेन वॉर्न आणि अनिल कुंबळे आहेत.

जगभरात क्रिकेट खेळणारे असंख्य खेळाडू आहेत. त्यापैकी मोजकेच खेळाडू देशांतर्गत क्रिकेट खेळतात आणि यातलेही हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचतात. त्यातही दीर्घकाळ एखाद्या संघाचा भाग राहणारे कमीच असतात. अश्विन हा अशा मोजक्या खेळाडूंपैकी एक. आजवर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये गोलंदाजी केलेल्या गोलंदाजांपैकी फक्त नऊजणांनी कसोटी क्रिकेटमध्ये ५०० हून अधिक बळी मिळवले आहेत. त्यापैकी चार जलदगती गोलंदाज आहेत तर फक्त पाच फिरकी गोलंदाज आहेत आणि या यादीत आपला अश्विन अण्णा चौथ्या स्थानी आहे. या आकड्यांवरून अश्विनच्या सातत्यपूर्ण कामगिरीचा अंदाज येतो. अश्विनने या वर्षाच्या सुरूवातीला इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत ५०० बळींचा टप्पा ओलांडला होता. अश्विनची आकडेवारी आपल्याला चकित करून सोडते. कसोटीत सर्वाधिक बळी मिळवणाऱ्या आंतरराष्ट्रीय गोलंदाजांच्या यादीत अश्विन सातव्या स्थानी आहे. २०११ मध्ये कसोटी पदार्पण केल्यानंतर अश्विन थांबला नाही. त्याने मागे वळूनही बघितले नाही. फक्त लोकप्रियतेमुळे नाही तर कामगिरीच्या बळावर त्याने संघातले स्थान टिकवून ठेवले, नव्हे त्याने स्वत:चे स्थान निर्माण केले. कसोटी बळींच्या बाबतीत भारतीय गोलंदाजांमध्ये त्याच्यापुढे फक्त अनिल कुंबळे आहे. कसोटीसह एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेट मिळून अश्विनने ७६५ बळी मिळवले आहेत. याबाबतीही त्याच्यापुढे फक्त अनिल कुंबळेच आहे.

अश्विन हा सर्वात कमी कसोटी सामन्यांमध्ये ५०, १००, १५०, २००, २५०, ३००, ३५०, ४००, ४५० आणि ५०० बळी मिळवणारा भारतीय गोलंदाज आहे हे फारसे कोणाला माहीतही नसावे. जसप्रीत बुमराहने ३४ कसोटी सामन्यांमध्ये १५० बळी मिळवण्याची कामगिरी केल्यानंतर त्याचे कोण कौतुक झाले. मात्र अश्विनने ही कामगिरी फक्त २९ सामन्यांमध्ये करून दाखवली आहे. भारताला गोलंदाजीच्या बळावर कसोटीत विजय मिळवून द्यायची अश्विनची टक्केवारीही सरस आहे. अश्विनने फिरकीला साथ देणाऱ्या भारतातीलच नाही तर ऑस्ट्रेलिया, इंग्लंडमधील खेळपट्ट्यांवरही यश मिळवले. त्याने १०६ कसोटींमध्ये ३७ वेळा एका डावात पाच बळी मिळवण्याचा पराक्रम केला आहे. यासोबतच कसोटी सामन्यात दहा बळी मिळवण्याची कामगिरी त्याने आठ वेळा केली आहे. अश्विनचा स्ट्राईकरेट ५०.७ एवढा जबरदस्त आहे. त्याने २६८ वेळा डावखुऱ्या फलंदाजांना बाद केले आहे. दुसऱ्या कोणत्याही गोलंदाजाला अशी कामगिरी करता आलेली नाही. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये एक किंवा दोन नव्हे तर तब्बल दहा वेळा स्पर्धेतल्या सर्वोत्तम खेळाडूचा किताब पटकावला आहे. सचिन तेंडुलकर आणि विरेंद्र सेहवाग यांना प्रत्येकी पाच वेळा हा मान मिळाला असून कपिल देव, अनिल कुंबळे, राहुल द्रविड आणि हरभजन सिंग यांना प्रत्येकी चार वेळा हा किताब मिळाला आहे. विराट कोहलीने अशी कामगिरी तीन वेळा केली असून रोहित शर्मा आणि रवींद्र जडेजा यांना एकदाही हा किताब मिळालेला नाही.

अश्विनने कसोटी पदार्पणातच कमाल केली होती. त्याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्यावाहिल्या कसोटी मालिकेत २२ बळी टिपले होते. तेव्हाच तो भारतीय क्रिकेटचे फिरकीचे भवितव्य असल्याचे निश्चित झाले होते. अनिल कुंबळेनंतर कोण, या प्रश्नाचे उत्तर अश्विनने आपल्या कामगिरीने देऊन टाकले होते. त्यानंतरच्या काळात अश्विनने भारतीय फिरकीची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. त्याने वेळोवेळी आपल्या गोलंदाजीच्या शैलीत तांत्रिक बदल केले. एका कसोटी मालिकेत पंचवीसहून अधिक बळी घेण्याची कामगिरी अश्विनने २५ वेळा केली आहे. अश्विनने कसोटीत पदार्पण केल्यानंतर म्हणजे २०११ नंतर भारतीय संघाने भारतात खेळलेल्या ६५ कसोटी सामन्यांमध्ये तो खेळला. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये मिळवलेल्या ५३७ बळींपैकी ३८३ घरच्या मैदानात मिळवले आहेत.

या बाबतीत अश्विनच्या पुढे फक्त मुरलीधरन, जेम्स अँडरसन आणि स्टुअर्ट ब्रॉड आहेत. अश्विनने गोलंदाजीसोबतच फलंदाजीतही चमक दाखवली आहे. त्याच्या नावे कसोटी क्रिकेटमध्ये पाच शतके आहेत. त्याने शिखर धवन, रिषभ पंत आणि वसिम जाफर यांच्यापेक्षा अधिक कसोटी अर्धशतके ठोकली आहेत. फलंदाजीच्या बळावरही अश्विनने अनेक कसोटी सामने जिंकून दिले आहेत किंवा अनिर्णित राखले आहेत. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये ३५०३ धावा केल्या आहेत. ३००० हून अधिक धावा आणि ५०० हून अधिक बळी मिळवणाऱ्या क्रिकेटपटूंच्या यादीत तो तिसरा आहे. त्याच्या पुढे फक्त शेन वॉर्न आणि स्टुअर्ट ब्रॉड आहेत.

अश्विन हा विचारी आणि हुशार क्रिकेटपटू. इंजिनिअर असल्यामुळे त्याने नेहमीच इंजिनिअरींगचे कौशल्य क्रिकेटमध्ये वापरले. त्याच्यात कर्णधार होण्याची क्षमता होती. मात्र नशिबाने त्याला नेहमीच हुलकावणी दिली. भारतीय क्रिकेट संघाच्या कर्णधारपदाचा मुकुट काही त्यांच्या शिरावर सजला नाही. कोणत्याही वलयाची, मानसन्मानाची अपेक्षा न करता अश्विन आपली कामगिरी बजावत राहिला. कारकिर्दीच्या अखेरीस न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानात झालेल्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत अश्विनला फारसे यश मिळू शकले नाही. त्यातच वयाच्या ३८ व्या वर्षी सतावणाऱ्या गुडघ्याच्या दुखापतीमुळेही त्याला भवितव्याबाबत अनिश्चिता वाटत होती. त्यातच सध्याच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातल्या तीन कसोटींपैकी एकाच कसोटीत अश्विनला संघात स्थान मिळाले. अन्य दोन कसोटींमध्ये अश्विनला बाहेर बसावे लागले. संघ व्यवस्थापनाने अश्विनच्या जागी रविंद्र जडेजा किंवा वॉशिंग्टन सुंदरला प्राधान्य दिले. गेली जवळपास १३ वर्षे भारतासाठी खेळताना कसोटीत ५३७ बळी मिळवल्यानंतर बाहेरच्या बाकांवर बसणे अश्विनला फारसे रूचले नसावे. युवा खेळाडूंना प्राधान्य दिले जात असल्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम ठोकण्याची हीच वेळ आहे, याची जाणीव अश्विनला झाली असावी. अश्विनने आजवर मानापमानाचा फारसा विचार केला नाही. मात्र आजवरची देदीप्यमान कामगिरी झाकोळली जाऊ नये यासाठी त्याने निवृत्तीचा निर्णय घेतला असावा.

अश्विनने ऑस्ट्रेलियाविरुद्धची कसोटी मालिका होईपर्यंत निवृत्ती जाहीर करायला नको होती, असे काही जाणकारांचे म्हणणे आहे. मात्र जे मनापासून वाटले ते त्याने केले, असेच म्हणावे लागेल. अश्विनसारखा अनुभवी फिरकीपटू निवृत्त झाल्यामुळे किमान कसोटीत तरी भारताच्या फिरकीची जबाबदारी जडेजा आणि अन्य युवा फिरकीपटूंच्या हाती असेल. अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला असला तरी आयपीएलमध्ये खेळणार आहे. त्यामुळे तिथे त्याच्या फिरकीची जादू अनुभवता येईल. मात्र भारतीय संघाला त्याची उणीव पुढचा काही काळ तरी निश्चितच भासत राहील.

## चर्चा आजची

# पर्यटकांचा अतिउत्साह ठरतोय जीवघेणा

संतोष राऊळ

रायगड जिल्ह्यातील मुरूड तालुक्यातील नावारूपाला आलेला काशीद समुद्रकिनारा हा देशभरातील पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. येथील शांत व खोल समुद्रकिनारा, सफेद वाळू आणि सभोवतालचे निसर्गरम्य वातावरण नेहमीच मनमोहून टाकणारे असते. सुट्टीच्या दिवसांत येथे मोठ्या प्रमाणात पर्यटकांची रेलचेल असते. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांनादेखील मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ होत असतो. काशीद समुद्रकिनारा फक्त पावसाळ्यातील तीन ते चार महिने पूर्णपणे बंद असतो. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या व्यवसायात होत असणारे नुकसान ते दिवाळी ते मे महिन्याच्या कालावधीत भरून काढत असतात.

काशीद समुद्रकिनारा हा अलिबाग-मुरूड रस्त्यावरून जाताना रस्त्यातच लागतो. त्यामुळे नवख्या पर्यटकांनादेखील या समुद्रकिनारी जाण्याचा मोह आवरता येत नाही. येथे राहण्यापासून ते जेवण, आंघोळीपर्यंत सर्वच व्यवस्था उपलब्ध आहे. पर्यटकांच्या मनोरंजनासाठी देखील किनाऱ्यावर वॉटर स्पोर्ट्स उपलब्ध आहेत. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रेलचेल सुरू असते. मात्र, या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीच काळजी घेण्यात आलेली दिसत नाही. कारण, हा समुद्रकिनारा जेवढा मनमोहून टाकणारा आहे, तेवढाच तो जिवघेणादेखील आहे. दरवर्षी या समद्रकिनारी बाहेरून येणाऱ्या पर्यटकांपैकी काहींना आपला जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे देशात नावारूपाला आलेला काशीद समुद्रकिनारा आता बदनामीच्या वाटेवर चालला आहे.

नुकतेच डिसेंबर महिन्यात दोन पर्यटक बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. एक नाताळच्या सुट्टीत आणि दुसरा थर्टी फर्स्टच्या दिवशी. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. जर पर्यटकांनी या किनाऱ्याकडे



पाठ फिरवली, तर स्थानिकांच्या पोटावर नक्कीच पाय येईल. यासाठी पोलीस प्रशासन व संबंधित सुरक्षा यंत्रणेने लक्ष देणे गरजेचे आहे. दरम्यान, प्रशासनाकडून काशीद किनाऱ्यावर सुरक्षेसाठी पावले उचलली जात असल्याचे भासवले जात आहे. परंतु, प्रत्यक्षात मात्र तसे काहीच निदर्शनात येत नाही. जर खरंच पावले उचलली गेली असतील, तर एकाही पर्यटकाचा बुडून मृत्यू व्हायला नको.

दिवाळीपासून पर्यटकांची प्रचंड रेलचेल वाढलेली आहे. त्या अनुषंगाने काशीद समुद्रकिनारी सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचललेली दिसत नाहीत. नुकतेच ३१ डिसेंबर रोजी पुण्याचा पर्यटक समुद्रात बुडून मृत पावला. तो बुडेपर्यंत काणाचेच त्याकडे लक्ष न जाणे, ही मोठी दुर्दैवी बाब आहे. तो जेव्हा दीड तासाने पाण्यावर तरंगताना दिसतो, तेव्हा सर्वांच्या लक्षात येणे म्हणजे मोठी शोकांतिका आहे. काशीद समुद्रकिनाऱ्यावरून जसजसे आपण पाण्यात जातो, तसतसा तो समुद्र खोल होत जातो. भरतीच्यावेळीदेखील पायाखालची वाळू सरकते. तर, ओहोटीच्या वेळी अशा समुद्रात टिकाव धरणं कठीणच. कधी कधी पर्यटकांची मस्तीदेखील अंगाशी येते. त्यांचा अतिउत्साहच अनेकदा जीवघेणा ठरत आहे. परंतु, तरीदेखील पर्यटकाच्या सुरक्षिततेसाठी या ठिकाणी कोणतेही ठोस पाऊल उचलले जात असल्याचे निदर्शनास येत नाही. हे असंच जर चित्र राहिलं, तर एक दिवस येथील पर्यटन संकटात येईल. स्थानिकांचे व्यवसाय व रोजगार बुडतील. सर्वांच्या पोटावर पाय येईल.

प्रशासन सुरक्षेच्याबाबतीत खूप कमी पडत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे जर पर्यटन वाचवायचे असेल, तर स्थानिकांनी पुढाकार घेऊन येथे येणाऱ्या पर्यटकांना योग्य ते मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. तसेच, प्रशासनाला देखील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पावले उचलण्यासाठी मजबूर करणे गरजेचे आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांना समुद्रात पोहायला जाण्यासाठी एका ठराविक खोलीपर्यंत जाण्याची मुभा असावी. जिथे धोक्याची पातळी आहे, त्याठिकाणी मोठा दोरखंड बांधून किंवा मोठे पोल उभारूप संरक्षित केले पाहिजे. जेणे करून पर्यटकांना धोक्याची पातळी लक्षात येईल किंवा बुडण्याच्या भीतीने तेथपर्यंत कोणी जाणार नाही. बघायला गेलं तर धोक्याची पातळी भरती-ओहोटीनुसार बदलत असते. परंतु, दोन्ही वेळी धोक्याची पातळी दर्शविणे गरजेचे आहे. तसेच समुद्रकिनारी व समुद्रात दर तासाला पोलिसांची किंवा सुरक्षा रक्षकांची गस्त असावी. तसेच, येथील दुकानदार, टपरी, हॉटेलवाले तसेच वॉटर स्पोर्ट्सचे चालक-मालक यांनीदेखील आपली जबाबदारी म्हणून अतिउत्साही पर्यटकांवर नजर ठेवणे तितकेच गरजेचे आहे. असे न केल्यास पर्यटन व्यवसाय नक्कीच धोक्यात येईल. याबाबत स्थानिकांबरोबर पर्यटकांनीही काळजी घ्यावी, एवढीच अपेक्षा.

## निमित्त

# एक धगधगता अग्नीकुंड क्रांतीज्योती

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले एक धगधगता अग्नीकुंड मानावा लागेल, सावित्रीबाई एक चिरंतन दीपशिखा आहे. सावित्रीबाई फुले युगश्री साध्वी आहे. एक संवेदनशील, कनवाळू मानवतावादी विचारांनी फुललेला सुगंधीत प्राजक्ताचे अंकुरबीज आहे. प्रखर बुद्धिमत्ता, कणखर बाणा असलेल्या, क्रांतीसूर्य ज्योतिबा यांच्या पत्नी म्हणून कुटुंबात वावरताना स्वतःच्या जीवनाची एक तेजस्वी गाथा ध्येयवेडाने निर्माण केली. स्वतःला ब्रह्मवृंद समजणाऱ्या ब्राम्हणांनी असहिष्णुता सामाजिक भेदभाव, शूद्र-अतिशूद्रता मानून बहुजन समाजातील माणसांना मानसिक गुलामगिरीत ठेवले होते. धर्माच्या नावावर अधर्माचे खेळ सुरू होते. दीनदुबळ्या फाटक्या माणसांना शोषणयुक्त जीवन जगावे लागे. सवर्णाचा प्रचंड जुलूम सहन करणे हीच त्या काळातील शोकांतिका होती. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी या अमानुष छळाविरूद्ध बंड केले. एकोणिसाव्या शतकातला, भारतीय स्वातंत्र्यापूर्वीच्या काळातला, हा जळजळीत इतिहास आहे. अंधश्रद्धा व अज्ञानात मृतावस्थेत वावरणाऱ्या जनतेला जागृतीचा दिव्य असा प्रकाश सावित्रीबाईने दिला. सत्यशोधाच्या, जनकल्याणाच्या मार्गावरील निर्भिडपणे, धैर्यशील वृत्तीने चालणाऱ्या वाटसरू म्हणजे सावित्रीबाई फुलेच. भारतातील पहिल्या शिक्षिका म्हणून जगाला त्यांची ओळख आहे. त्यांना हाती घेतलेल्या कार्यावर अढळ निष्ठा होती. दूरदृष्टी कठोर परिश्रम व शिक्षणाचा व्यासंग असे अनेक पैलू त्यांच्या अंगी बाणलेले होते. महाकर्मयोगी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समाज कार्यातील सावित्रीबाईंचा सहवास, सहकार्य सहनशीलतापूर्वक प्रेम म्हणजे किरण व प्रकाश यामधील एकरूपतेचे दर्शन म्हणावे लागेल. विचारातील एकरूपता, एकाग्रता आणि ध्येयवाद हे त्यांच्या विलक्षण कर्तृत्वाचे मनोरे आहेत. त्याकाळी पुणे शहरात ब्राह्मणांचे वर्चस्व होते. पेशवाईचा प्रभाव जनमानसावर होता. देवधर्माच्या नावाखाली शुद्र, अतिशुद्र दुबळ्या जमातीचा छळ होत होता. स्त्री म्हणजे फक्त उपभोगाची वस्तू असे मानले जात होते. हिंदू धर्मात स्त्रियांवर अत्याचार होत होते. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. पुरूष ब्राह्मणांनीच शिक्षण घ्यायचे असा प्रवाद होता. पेशवाई वाजसत्तेचे अभय असल्याने धर्मसत्ता प्रबळ बनली होती. अन्य बहुजन समाजही अस्वस्थ होता. अशा परिस्थितीत सावित्रीबाईने स्त्रियांना धैर्य दिले. समाजातील गरीब, दुबले, दु:खी, कष्टी, शुद्र, दलित यांच्या उद्धारासाठी आपले जीवन समर्पित केले. क्रांतीज्योती आणि सावित्री बाई फुले यांचे कार्य म्हणजे एक तेजोमय आख्यायिकाच मानावी लागेल.'स्त्री' मुक्ती आंदोलनाच्या त्या प्रेरणास्थान होत्या.

– बाळ सिंगासने, पेण

## दिनविशेष

# भारतीय स्त्रीवादाची जननी सावित्रीबाई फुले

स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री पुरुष भेदभाव शिगेला पोहोचला होता. त्याकाळी स्त्रियांना मचूल अन् मूलफ या चौकटीतून बाहेर काढून त्यांना सुशिक्षित करून स्वयंनिर्भर करणाऱ्या वंदनीय सावित्रीबाई फुले यांचा आज जन्मदिवस. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्याच्या खंडाळा तालुक्यातील नायगाव येथील खंडोजी नेवसे-पाटील यांच्या इमानदार घराण्यात झाला, अन् जणू काही स्त्री शिक्षणाची दिव्यज्योती प्रकाशित झाली. त्यांना आपण आद्य शिक्षिका म्हणून ओळखतो व त्या कवयित्रीही होत्या. त्या जेव्हा शिक्षित झाल्या तेव्हा आपल्या पतीच्या खांद्याला



खांदा लावून सावित्रीबाईंनी पुण्याच्या भिडेवाड्यात एक मुलींची शाळा काढली. हीच सामान्य स्त्रीवर्गासाठी उभारलेली पहिली शाळा होती. सुरुवातीच्या या भिडेवाड्यातील शाळेत सहाच मुली होत्या. ज्या शिक्षणासाठी आल्या होत्या. कारण स्त्रियांनी शिकवावे व एका स्त्रीने शिकवावे ही प्रथाच नव्हती. त्यांनी केवळ चार वर्षात अठरा शाळा काढल्या. सावित्रीबाईंनी शाळा काढल्या. त्यानंतर सामान्य लोकांसाठी त्या शाळा सुरु झाल्या.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, असे बाबासाहेबांनी म्हटले. त्यानंतरच्या अनेक विचारवंतांनी शिक्षणाबद्दलच्या अनेक व्याख्या केल्या. आपआपले विचार मांडले. परंतु खरं शिक्षण म्हणजे काय? हे सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले यांनी व्याख्या न करता कृतीतून दाखवून दिले. आज स्त्रिया शिकल्या, नावारुपाला आल्या आणि ते घडले एका सावित्रीबाईंमुळे. परंतु आज त्या स्त्रिया नावारुपाला आल्या असल्या तरी त्यातील बऱ्याच स्त्रियांना आजही सावित्रीबाई आठवत नाहीत. त्यांनी केलेला त्याग आठवत नाही. ती अंगावर धसकटे झेलणे व त्या शेणाने तिचे अंग अक्षरशः न्हाऊन निघणेही आठवत नाही. कधी एखाद्या वेळेस सावित्रीबाईची जयंती येते व त्या दिवशी फक्त काही मोजक्याच स्त्रिया सावित्रीबाईचा उदोउदो करतात. बाकिच्यांना सावित्रीबाई कोण? हे त्या शिकल्या असल्या तरी कळत नाही. विचार करण्यासारखी बाब अशी की, आज स्त्रिया शिकल्या. सुसंस्कृत झाल्या. त्या सावित्रीबाईंच्या कार्याचे द्योतक आहे. जर आज सामान्य घरातील स्त्री शिकली नसती, तर आज तिला कोणी विचारले नसते. आज ज्या स्त्रिया मोठ्या पदावर गेल्या, कोणी राष्ट्रपती बनल्या, कोणी अंतराळात गेल्या, कोणी पंतप्रधान बनल्या. हर एक क्षेत्रात आज स्त्रियांनी आपले स्थान निर्माण केले आहे. सावित्रीबाईंमुळे स्त्रियांना आज आत्मनिर्भरतेचे पंख फुटले. सावित्रीबाईंनी बाल विवाह, विधवा स्त्रियांचे केशवपन, बालहत्या करणे, हुंडापद्धती, जातीभेद, वर्णभेद या कुप्रथांना कडाडून विरोध केला, तर स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह यांना प्रोत्साहित केले. म्हणूनच स्त्रियांनी सावित्रीबाईंना विसरु नये व त्यांचा त्यागही विसरु नये. अशा या स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांना जयंती दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

३ जानेवारी

१) श्री.विश्वनाथ महादेव पाटील पिटकिरी,अलिबाग, ३-१-१९४४

२) श्रीम.अंजली रामचंद्र घरत अलिबाग, ३-१-१४५

३)श्री.चिंतामण रामा पयर श्रीबाग-२, अलिबाग ३-१-१९५२


**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल


# मद्यपी वाहन चालकांवर कारवाई

## ठाण्यात साडेतीनशे वाहने जप्त



| ठाणे | प्रतिनिधी |

ठाणे शहरासह जिल्ह्यात थर्टी फर्स्टचे दारू पिऊन सेलिब्रेशन करणे तरुणाईला चांगलेच महागात पडले आहे. वाहतूक विभागाने केलेल्या कारवाईमुळे मद्यपी वाहन चालकांची ३७७ वाहने जप्त करण्यात आली असून त्यांना न्यायालयाच्या कारवाईला सामोरे जावे लागले आहे. मद्यपान करून वाहन चालवणे कायद्याने बंदी असून याबाबतचे आवाहन करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे वाहतूक पोलिसांनी नाकाबंदीत पकडून त्यांच्यावर ही कारवाई केली आहे. तर, महिन्याभरात १ हजार ३२६ जणांवर ड्रॅन्क अँड ड्राईव्हची कारवाई झाली आहे.

ठाण्यात थर्टी फर्स्टच्या रात्री मद्यपान करणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली होती. अशा तळीरामांकडून वाहन चालवताना अपघात होऊ नये याकरिता वाहतूक विभागाकडून जनजागृती करण्यात येते. ठाणे वाहतूक विभागाने देखील या प्रकारची जनजागृती करून १ डिसेंबरपासूनच ड्रंक अँड ड्राईव्हची कारवाई वेगाने सुरू केली होती. त्यामध्ये वाहतूक पोलिसांना तब्बल १ हजार ३२६ मद्यपी आढळून आले होते. या सर्वांवर न्यायालयाच्या निर्देशानुसार दंडात्मक कारवाई झाली आहे. तर, वाहतूक विभागाकडून त्याच दिवशी तळीराम चालवत असलेली वाहने जप्त करण्यात आली आहेत.

या कारवाईचा वेग २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबरच्या कालावधीत जास्त प्रेमाणात वाढवण्यात आला होता. या सात दिवसांत वाहतूक पोलिसांनी दारू पिऊन वाहन चालवताना ६५४ जणांना ताब्यात घेतले, तर दारू पिणाऱ्याच्या मागे बसणाऱ्या ९३ जणांना देखील कारवाईला सामोरे जावे लागले आहे. वाहतूक विभागाने त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई केली.

ड्रंक अँड ड्राईव्हची सर्वाधिक सर्वाधिक कारवाई ३१ डिसेंबरच्या रात्री झाली. या एका दिवसात वाहतूक पोलिसांनी मद्यपी चालक आणि वाहन चालकाच्या मागे दारू पिऊन बसणाऱ्या अशा एकूण ३७७ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

**३१ डिसेंबर रोजी झालेली कारवाई**

ठाणे नगर- १७, नौपाडा- १५, कळवा- १६, मुंब्रा- २६, कोपरी- ६, वागळे- २०, कापूरबावडी- १८, कासारवडवली- २७, भिवंडी- १४, नारपोली- ४३, कोनगाव- ३१, कल्याण- २७, डोंबिवली- १९, कोळसेवाडी- २७, विठ्ठलवाडी- १८, उल्हासनगर- २४, अंबरनाथ- २९.

> “ड्रंक अँड ड्राईव्ह नियमांची अंमलबजावणी व्हावी याकरिता १७ विभागात ४५ ठिकाणी नाकाबंदीचे पथक तयार करण्यात आले होते. यामध्ये ३७७ मद्यपींवर कारवाई केली. त्यांची वाहने जप्त करून पुढील कारवाईसाठी त्यांना दुसऱ्या दिवशी न्यायालयात पाठवण्यात आले. कारवाई करण्यात आलेल्यांमध्ये तरुणांचा मोठा सहभाग आहे.”
> – पंकज शिरसाट, उपायुक्त, वाहतूक शाखा

# मारहाणीत पुण्यातील महिलेचा मृत्यू

| पुणे | प्रतिनिधी |

पुण्यातील थेऊरमध्ये लघुशंका करताना हटकल्याने तिघा जणांनी सुरक्षारक्षकासह त्याच्या पत्नीला दगडाने बेदम मारहाण करून हवेत गोळीबार केल्याची घटना घडली होती. यात पती-पत्नी गंभीर जखमी झाले होते. आता जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. शीतल चव्हाण (२९) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी सतीश लोखंडे, अजय मुंढे, भानुदास शेलार या तिघांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-सोलापूर रस्त्यावर असणाऱ्या थेऊर भागात एका जमिनीचे प्लॉटिंग सुरू आहे. तिथे अक्षय चव्हाण त्याच्या बायकोसोबत रखवालदारीचे काम करत होता. शुक्रवारी रात्री एका गाडीतून तिघे जण उतरले आणि त्यांनी तिथे मोकळी जागा असल्यामुळे लघुशंका केली. त्यावेळी अक्षयने त्यांना हटकले. यातून त्या तिघांची आणि अक्षयची बाचाबाची झाली. दरम्यान, अजय मुंढे याने त्याच्याजवळील पिस्तुल ने हवेत गोळीबार केला आणि दगडफेक केली. या दगडफेकीत दगड लागल्याने अक्षयची बायको जखमी झाली. घटनेनंतर आरोपींनी तिथून पळ काढला.

यावेळी, पोलिसांनी जखमी झालेल्या शीतल चव्हाण यांना तात्काळ लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर पोलिसांनी लोणीकंद तपास पथक व गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा रचून फॉर्च्युनर गाडी अडविली. या गाडीतील आरोपी सतीश लोखंडे, अजय मुंढे व भानुदास शेलार यांना अटक केली. रुग्णालयात दाखल असलेल्या शीतल यांचा मात्र उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# पोलीस निरीक्षकावर लाचप्रकरणी गुन्हा

| ठाणे | प्रतिनिधी |

मुरबाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज कामत आणि पोलीस शिपाई सचिन उदमले यांच्यावर ठाणे विभागाच्या लाच लुचपत विरोधी पथकाने लाचेची रक्कम मागणी केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील तक्रारदार यांच्या भाच्याच्याविरुद्ध मुरबाड पोलीस ठाण्यात एका महिलेने तक्रार दिलेली आहे. त्याच्यावर कोणतीही कारवाई न करता तक्रारी अर्ज निकाली काढून मदत करण्यासाठी कामत यांनी सचिन उदमले यांना तक्रारदार यांच्याकडे लाचेची रक्कम मागण्यासाठी प्रवृत्त केले. त्यामुळे उदमले यांनी त्यांचे वरिष्ठ कामत यांच्या सांगण्यावरून तक्रारदार यांच्याकडे २ लाख रुपये लाचेची मागणी करण्यात आली होती.

# संतप्त शेतकऱ्यांनी भाजीपाला फेकला

| पुसद | प्रतिनिधी |



नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी तालुक्यातील भाजी उत्पादक शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या टोमॅटो आणि वांग्याची दहा रुपये कॅरेटने व्यापाऱ्यांनी हर्राशी केली. हा बेभाव दिसताच शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला. त्यांनी भाजीपाला व्यापाऱ्याला न विकताच भाजी मंडईत अक्षरशः फेकून दिला आहे.

पुसद शहराच्या सभोवतीला सिंचनाची सुविधा असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर भाजीपाला पिकवतात. आरेगाव, निंबी, पार्डी, जांबबाजार, हर्शी, लोहरा इजारा, इंदापूर, आमटी अशा अनेक खेड्यातून दररोज शेतकरी भाजीपाला पुसद येथील भाजी मंडईत आणतात. आधीच्या रात्रीच भाजीपाला स्वच्छ करून सकाळी विक्रीसाठी भाजी मंडईची वाट धरतात. हिवाळ्यात भाजीपाल्याची लागवड मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. त्यामुळे भाजीपाल्याला चांगले दाम मिळत नाही. भाव गडगडल्याने शेतकरी चिंतेत पडले आहेत. अशातच काही शेतकऱ्यांनी टोमॅटो आणि वांगी बुधवारी (दि.१) भाजी मंडईत आणले. मात्र, व्यापाऱ्यांनी केवळ १० रुपये कॅरेटप्रमाणे हर्राशी केली. एका कॅरेटमध्ये साधारणतः २५ किलो टोमॅटो वा वांगी बसतात. त्यामुळे प्रती किलो चाळीस पैसे भाव शेतकऱ्यांना मिळाला.

टोमॅटो, वांगी तोडण्यासाठी मजुरांना ३०० रुपये रोज आहे. त्यात वाहतूक खर्च व उत्पादन खर्च यांचा कुठेही मेळ बसत नाही. एवढ्या कमी भावात शेतातून मंडईत भाजीपाला आणणेही परवडत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले. संतप्त शेतकऱ्यांनी आपले टोमॅटो, वांगे मंडईत रस्त्यावर फेकून दिले.

# बीडमध्ये जनआक्रोश मोर्चाचे आयोजन

| बीड | प्रतिनिधी |

बीड येथील सर्व दलित, बहुजन समाजातील संघटनांनी एकत्र येऊन सोमवारी (दि.६) जनआक्रोश मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी संबंधित पोलिसांवर हत्येचा गुन्हा दाखल करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणारे गृहमंत्री अमित शाह यांना मंत्रिमंडळातून काढावे. परभणीत महिलांवर अमानुष लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात. नोकऱ्यांतील खासगीकरण रद्द करावे, रिक्त जागा भराव्यात. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्ती द्यावी. आरक्षणामधील वर्गीकरण कायदा रद्द करावा आदी मागण्यांसाठी मोर्चा निघणार आहे.

# जाहिरात फलक लावणाऱ्यांना प्रशासनाचे अभय?

| मुंबई | प्रतिनिधी |



शहरातील बेकायदा फलक आणि होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर महापालिकेकडून वारंवार कारवाई केली जाते. पालिकेच्या कारवाईकडे दुर्लक्ष करणाऱ्या बेकायदा जाहिरातफलक आणि होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली आहे. मात्र, पोलिसांकडून गुन्हे दाखल करून घेण्यास विलंब केला जात आहे. त्यामुळे बेकायदा जाहिरातफलक आणि होर्डिंग्ज लावणाऱ्यांना पोलीस प्रशासनाचे अभय आहे का? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

महापालिकेच्यावतीने ‘स्वच्छ भारत’ अभियानाअंतर्गत सर्वच विभागांची टीम एकाच वेळी रस्त्यावर उतरून स्वच्छता, अतिक्रमण हटविणे, तसेच बेकायदा जाहिरातफलक, होर्डिंग्ज व त्यासाठी उभारण्यात आलेले सांगाडे काढण्याचे काम करीत आहे. काही भागांत ही कारवाई झाल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी खांबांवर आणि चौकांमध्ये पुन्हा जाहिरातफलक लावले जात असून, विद्रूपीकरण केले जात आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. बेकायदा जाहिरातफलक लावल्याप्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने २०१७ मध्ये बेकायदा जाहिरात फलकांसंदर्भातील खटल्यामध्ये बेकायदा फलक लावणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, महापालिका प्रशासनाने मागील काही महिन्यांमध्ये बेकायदा जाहिरातफलक लावल्याबद्दल संबंधितांवर विद्रुपीकरणाचा गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांना पत्र दिले आहे. मात्र, अद्यापि त्यावर कार्यवाही झाली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता महापालिका प्रशासन पोलीस आयुक्तांकडे यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

# मुलाने केली आई-वडिलांची हत्या

## दुहेरी हत्याकांडाने नागपूर हादरले

| नागपूर | प्रतिनिधी |




नवीन वर्षाच्या सुरुवातीला देवदर्शन, आध्यात्मिक, तीर्थस्थानी जाऊन वर्षाची चांगली सुरुवात केली जाते. मात्र, नववर्षाच्या पहिल्याच दिवशी दुहेरी हत्याकांडाने नागपूर हादरले आहे. अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारा मुलगा गेली दोन वर्षे नापास होत होता. त्यामुळे इंजिनीअरिंग जमत नसेल तर शेती कर, आयटीआय किंवा पॉलिटेक्निक कर, असा सल्ला देणाऱ्या आईवडिलांना मुलाने अत्यंत थंड डोक्याने संपवले. आईचा गळा दाबून, तर वडिलांच्या मानेवर वार करून त्यांची हत्या केली. लीलाधर आणि अरुणा डाखोळे असे दुर्दैवी आईवडिलांचे नाव आहे. दरम्यान, हत्या करून फरार झालेला मुलगा उत्कर्ष याला कपीलनगर पोलिसांना अटक केली आहे.

घरात वारंवार त्याला शिक्षण सोडून देऊन शेती करण्यासाठी टोमणे मारण्यात येत होते. याच कारणांनी वडिलांनी २५ डिसेंबरला उत्कर्षला मारहाण केली आणि शिक्षण सोडून शेती करण्यास सांगितले. आईने त्याची बॅग भरून ठेवली होती. त्यामुळे उत्कर्ष अस्वस्थ झाला होता. त्याने दुसऱ्या दिवशी २६ डिसेंबरला पहिल्यांदा घरात काम करत असलेल्या आईचा गळा दाबून खून केला. तासाभराने बाहेर गेलेले वडील घरी आल्यानंतर वडिलांच्या मानेवर चाकूने वार करून त्यांचीही हत्या केली. हत्याकांडानंतर अत्यंत थंड डोक्याने दोघांचेही मृतदेह घरात तसेच ठेवले, घराला कुलूप लावले आणि तो पळून गेला.

# मोहने येथे मुलीचा विनयभंग

| कल्याण | प्रतिनिधी |

एका पन्नास वर्षीय भोंदू बाबावर एका मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी कल्याणमधील खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना कल्याण नजीक असणाऱ्या मोहने परिसरात घडली. याप्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्याचे प्रभारी डॉ.अमरनाथ वाघमोडे यांनी सांगितले की, पीडित मुलगी बाबाकडे आपली समस्या सांगण्यासाठी गेली होती. यावेळी बाबाने तिचा विनयभंग केला. या भोंदू बाबाचे नाव अरविंद जाधव असल्याचे सांगण्यात आले.

# मृत पिल्लासाठी डॉल्फिनची धडपड

| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |




आपल्या परिवारातील एक सदस्य जखमी होऊन मृत झाल्यानंतर हंपबॅक डॉल्फिन्स भावनाविवश होत त्याची काळजी घेत असल्याची एक हृदयद्रावक घटना मंगळवारी मालवण जवळील तळाशील समुद्रात पाहायला मिळाली.

तळाशील समोरील समुद्रात कवडा रॉक जवळ एक प्रौढ डॉल्फिन एका डॉल्फिनच्या मृत पिलाला पाण्याच्या पृष्ठभागावर येऊन आपल्या तोंडाच्या साहाय्याने ढकलत असल्याचे पर्यटकांना दिसले. प्रथमदर्शनी डॉल्फिन एकमेकांवर हल्ला करीत आहेत, असे वाटत होते. परंतु, जवळ जाऊन पाहिले असता, एक प्रौढ डॉल्फिन एका मृत डॉल्फिनला पाण्याच्या पृष्ठभागावर ढकलत असल्याचे स्पष्ट झाले.

कोकणच्या समुद्रातील डॉल्फिनवर अभ्यास केलेले सागरी जीव संशोधक मिहीर सुळे यांनी याबाबत सांगितले की, डॉल्फिनला श्वास घेण्यासाठी पाण्याच्या पृष्ठभागावर यावे लागते. ते एखाद्या परिवाराप्रमाणे कळपाने राहतात. या कळपातील एखाद्या सदस्याला इजा झाली, तर ते त्याची काळजी घेतात. पिलांच्या बाबतीत तर अजून जास्त. तळाशील येथील घटनेत मृत डॉल्फिनचे पिल्लू हे कधी मृत झाले हे इतर डॉल्फिनच्या लक्षात येत नाही किंवा त्यांना इतकं दुःख होत असेल की, त्यामुळे त्यांना त्या मृत पिलाला सोडवत नाही. मृत पिल्लू जिवंत आहे, असे समजून त्याला जिवंत ठेवण्यासाठी ते त्याला पाण्याच्या पृष्ठभागावर ढकलत आहेत.

# महायुती सरकारची ‘लाडके आरोपी’ योजना

## वडेट्टीवार यांचा महायुतीला टोला

| बीड | प्रतिनिधी |



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याकांडाशी संबंधित खंडणीप्रकरणाचा मास्टरमाइंड वाल्मीक कराड मंगळवारी पुण्यात सीआयडी मुख्यालयात शरण आला होता. त्यानंतर रात्रीच त्याला केजच्या न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यानंतर वाल्मीक कराडची रवानगी पोलीस कोठडीत करण्यात आली. यादरम्यान, वाल्मीक असलेल्या बीडच्या पोलीस स्थानकात ५ नवीन पलंग मागवण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. यावरुन रोहित पवार यांच्यानंतर आता आमदार विजय वडेट्टीवार यांनीही महायुती सरकारवर निशाणा साधला आहे.

महायुती सरकारच्या लाडके आरोपी योजनेत वाल्मीक कराड येत असल्याने बीड पोलीस स्थानकात नवीन पाच पलंग आले का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी सोशलमिडीयावर पोस्ट करून केला आहे. तसेच, वाल्मीक कराड पोलीस कोठडीत असताना पाच पलंगांची आवश्यकता भासावी, इतके योगायोग चित्रपटात ही नसतात. आरोपीचे लाड पुवण्याची ही सुरुवात आहे, हळूहळू टिव्ही, एसी, पंचतारांकित हॉटेल मधील जेवण सगळच मिळेल, असा टोलाही वडेट्टीवार यांनी लगावला आहे.

# प्रेमप्रकरणातून हत्या

| वाघोली | प्रतिनिधी |

१७ वर्षीय अल्पवयीन मुलीशी प्रेमाचे संबंध तरीही दुसऱ्या मुलीशी लग्न करण्याची तयारी. यातून दोघात वाद. मुलीचा मित्राच्या मदतीने खून केला. तिचा मृतदेह दिवे घाटात टाकून दिला. यानंतर १५ दिवसांनी दुसऱ्या मुलीशी लग्नही केले. ५६ दिवस मुलगी बेपत्ता असल्याने पोलीस व नातेवाईकही हैराण होते. अखेर खुनाचा उलगडा झाला अन् लोणीकंद पोलिसांनी दोघांना बेड्या ठोकल्या. ही घटना फुलगाव येथे घडली.

# वीजबिलाचा रत्नागिरी पालिकेला भूर्दंड

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

रत्नागिरी तालुक्यातील शीळ धरण ते शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जॅकवेलपर्यंत टाकण्यात येणारी पाईपलाईन डिसेंबर २०२४ संपला तरी अजून टाकण्यात आलेली नाही. नव्याने टाकलेली ही पाईपलाईन गेल्या पावसामध्ये वाहून गेली. शीळ नदीतून जॅकवेलपर्यंत सहा फ्लोटिंग पंपाद्वारे पाणी उचलून ते जॅकवेलमध्ये आणले जाते. तेथून ते साळवी स्टॉप येथील जलशुद्धीकरण केंद्रामध्ये आणून शहराला वितरित होते. पाईपलाईन न टाकल्यामुळे सहा फ्लोटिंग पंपाच्या लाखोंच्या वीजबिलाचा भूर्दंड पालिकेवर पडत आहे. तसेच, तात्पुरत्या व्यवस्थेवर प्रचंड ताण पडत असून टंचाईची भीती व्यक्त केली जात आहे. नवीन जॅकवेल अत्यंत जलदगतीने कार्यान्वित करण्यात आली; मात्र, शीळ धरण ते जॅकवेल ही जलवाहिनी टाकण्याचे काम मागेच पडले. त्यामुळे पावसापूर्वी शीळ धरण ते जॅकवेल अशी शीळ नदीच्या पात्रातून पाईप टाकण्यात आली. धरणाच्या ओव्हरफ्लोचे पाणी अडवून त्यामध्ये सहा फ्लोटिंग पंप बसवण्यात आले आहेत. या पंपाच्या साहाय्याने पाणी उचलून ते जॅकवेलमध्ये आणले जाते. तेथून ते साळवी स्टॉप येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणून शहराला वितरित होते; परंतु ही तात्पुरती व्यवस्था करण्यात आली होती. यावर आता ताण पडत आहे. आज याच पंपांच्या साह्याने शीळ धरणाच्या ओव्हरफ्लोमधून पाणी उचलण्यात येते.

## रशियाचा पक्षी नेरूळमध्ये स्थिरावला | चाणक्यच्या तळ्यात दर्शन

# ‘बायलॉन्स क्रेक’ पक्ष्याचे आगमन

| ठाणे | प्रतिनिधी |




नोव्हेंबर महिन्यात कडाक्याच्या थंडीची चाहूल लागताच, उत्तरेकडील पक्षी दक्षिण भागाकडे झेपावताना दिसतात. यापैकी युरोप आणि रशिया येथून आलेला बायलॉन्स क्रेक हा पक्षी नेरूळ येथील ‘ट्रेनिंग शीप चाणक्य’च्या गवताळ भागात दिसल्याची माहिती पक्षी अभ्यासक वीरेंद्र घरत यांनी दिली आहे.

हवामानातील वाढत्या बदलामुळे अनेक स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन उशिराने झाले आहे. यात युरेशिया येथून आलेल्या ‘बायलॉन्स क्रेक’ (लावी फटाकडी) या पक्ष्याचा समावेश आहे. नवी मुंबई नेरूळ परिसरातील गवताळ भागात वावरणाऱ्या या पक्ष्याला पाहण्याची संधी पक्षी मित्रांना खुणावत आहे. बायलॉन्स क्रेक हा भारतासह श्रीलंका, बांगलादेश, अंदमान बेटे आदी दक्षिण आशियायी देशात वास्तव्याला असतो. हा १६ ते १८ सेमी लांबीचा असतो आणि छोट्या कोंबडीच्या आकाराचा असतो. जिथे पाणथळ गवताळ भाग आहे, तेथे त्यांचे वास्तव्य असते. हा पक्षी काहीसा भित्रा असून गवतातून फारच कमी वेळा बाहेर येतो आणि त्याचे खाणे चिखलातील किटक व छोटे मासे आहे.

‘बायलॉन्स’ची चोच आखूड, सरळ व पिवळी किंवा हिरवी असते. पूर्ण वाढ झालेल्या पक्षांची पाठ तपकिरी असून त्यावर पांढरे ठिपके असतात. पंखाखाली व शेपटीखाली काळे पांढरे पट्टे असतात. शेपटी आखूड असते. पाय हिरवे, पायाची बोटे लांब असल्यामुळे त्याचा उपयोग चिखलातून चालताना होतो. पाणथळ गवतातील सुक्या जागेवर घरटे बनवतो आणि चार ते सहा अंडी घालतो. या पक्ष्यांच्या पाच उपजाती असून त्या-त्या प्रत्येक भागाप्रमाणे त्याचे वैशिष्ट्य वेगळे आहे. ‘लुईस अँटनी फ्रांसवा बायलॉन’ या फ्रेंच निसर्ग शास्त्रज्ञावरून या पक्ष्याला हे नाव पडले आहे, असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, अशी माहिती ठाणे येथील पक्षी अभ्यासक वीरेंद्र घरत यांनी दिली आहे.

# नाराज असल्याच्या बातम्या अफवा : साळवी

| मुंबई | प्रतिनिधी |



हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा निष्ठावंत सैनिक ही माझी ओळख आहे. हा निष्ठावंत शिवसैनिक बाळासाहेबांचाच राहणार. मी नाराज असल्याच्या अफवा आहेत, असे शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उपनेते राजन साळवी यांनी सांगितले आहे. राजन साळवी नाराज असून ते भाजपात प्रवेश करणार असल्याच्या वावड्या उठवल्या जात आहेत. यावर राजन साळवी यांनी स्पष्टीकरण देताना म्हटले की, विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये आम्ही पराभवाला सामोरे गेलेलो आहोत. ते दु:ख, ती खंत, त्या वेदना माझ्यासह मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांना आणि सामान्य जनतेला आहे. पराभवाची खंत असताना भविष्याचे मार्गक्रमण करतोय. तुमच्या सर्वांच्या माध्यमातून मला समजतंय की मी भाजपच्या, शिंदे गटाच्या वाटेवर आहे. परंतु, तसे काहीही नाही. मी माझ्या मतदारसंघात सक्रिय आहे.

# शालेय पोषण आहाराचे लेखापरीक्षण

## • खर्चाची माहिती ऑनलाईन सादर करण्याचे शिक्षण विभागाचे निर्देश

**शालेय पोषण आहाराचा लेखापरीक्षण करणेचे आदेश दिले असले तरी शाळांकडून शुल्क आकारले जाणार नाही. त्यामुळे शाळांनी कोणालाही शुल्क, मोबदला देऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.**

**| रायगड | प्रतिनिधी |**

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शाळांना अनुदान दिले जाते. योजनेची अंमलबजावणी योग्य पद्धतीने सुरू आहे का, याची तपासणी करण्यात येणार असून, प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे २०२०-२१ ते २०२४ या काळातील शाळांच्या पोषण आहाराच्या खर्चाचे लेखापरीक्षण करण्यात येणार असून, माहिती सादर न केल्यास नियमानुसार दंडात्मक आणि प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे.



प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत. प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत जिल्हा परिषद आणि प्राथमिक शिक्षण संचालनालयस्तरावरून शाळांना अनुदान देण्यात येते. शाळांना देण्यात आलेल्या अनुदानाचा वापर नियमानुसार होणे आवश्यक असते. शाळा, तालुका आणि जिल्हास्तरावर योजनेची अंमलबजावणीसंदर्भातील खर्चाचे लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत २०२०-२१ ते २०२४ या कालावधीतील शाळा, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका यांच्याकडील प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेच्या अभिलेख्यांची तपासणी करण्यात येणार आहे.

राज्यातील योजनेस पात्र सर्व शाळांचे लेखापरीक्षण करण्यात येणार असल्याने शाळांना ऑनलाइन पद्धतीने माहिती सादर करावी लागणार आहे. शाळांनी माहिती भरताना शाळेकडील उपलब्ध सर्व अभिलेखांचा आधार घेऊन योग्य, अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती भरावी. माहिती शाळांनी केवळ एकदाच भरायची आहे. त्यामुळे माहिती भरताना योग्य ती दक्षता शाळाप्रमुख-मुख्याध्यापक यांनी घेणे आवश्यक आहे. त्यानंतर सनदी लेखापाल संस्थेकडून टप्प्याटप्प्याने विविध जिल्ह्यांचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. तालुकानिहाय लेखापरीक्षणाचा कार्यक्रम जिल्ह्यांना कळविण्यात येईल. क्षेत्रीय स्तरावर शाळांकडील अभिलेख्यांची शाळानिहाय माहिती आणि प्रत्यक्ष अभिलेख्यांची पडताळणी करण्यात येणार आहे. लेखापरीक्षणास जिल्ह्यातील सर्व शाळांचे लेखापरीक्षण होण्यासाठी नियोजन करण्याची जबाबदारी प्राथमिक शिक्षणाधिकारी यांची राहील. शालेय पोषण आहार योजनेचा लाभ मिळणाऱ्या सर्व शाळा, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगर परिषद आणि नगरपालिका यांना लागू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात वाचन संकल्प

## आधुनिक काळात वाचन संस्कृती जोपासली पाहिजे - डॉ. कारभारी काळे

**| महाड | वार्ताहर |**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात वाचन संकल्प महाराष्ट्र या कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. या उपक्रमाचा प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी अभ्यासक्रमातील पुस्तके वाचन करण्याबरोबरच इतर पुस्तकांचे देखील वाचन केले पाहिजे. आधुनिक काळात मागे पडत जाणारी वाचन संस्कृती जोपासण्याचे काम सर्वांनीच केली पाहिजे, असे मत व्यक्त केले.



तरुण पिढीला ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करणे आणि वाचन संस्कृती वाढवण्यासाठी राज्यात १ ते १५ जानेवारी दरम्यान 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दरवर्षी राबवण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. हा उपक्रम सार्वजनिक आणि शिक्षण संकुलातील ग्रंथालयांच्या माध्यमातून राबवण्यात येणार आहे. यामध्ये सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाचा प्रारंभ विद्यापीठातील ग्रंथालयामध्ये करण्यात आला. यावेळी पुस्तक प्रदर्शन आणि समुखिक पुस्तक वाचन कार्यक्रम घेण्यात आला. कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचन संस्कृतीमुळे आपल्या जीवनामध्ये कशा पद्धतीने बदल घडवून येतो. याबाबत मार्गदर्शन केले. पुस्तके लिखाण करताना विविध पुस्तकांचे वाचन करूनच पुस्तकाची निर्मिती केली जाते. यामुळे आपल्या जीवनात सर्वांगीण विकास होण्यासाठी अभ्यासक्रमाच्या पुस्तकांबरोबरच इतर पुस्तकांचे देखील वाचन आवश्यक आहे, असे सांगितले. यावेळी विद्यापीठाच्या विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये यंदा प्रदूषण नियंत्रणात

## पनवेल महानगरपालिकेचा दावा



**| पनवेल | वार्ताहर |**

मागील वर्षी हवेतील धूलिकण कमी करण्यासाठी केलेल्या विविध उपाययोजनांमुळे वर्षाच्या शेवटी पनवेल महापालिका क्षेत्रात साडेतीनशे बांधकामे सुरू असूनही धूलिकणांमुळे गुणवत्ता निर्देशांकाचे प्रमाण वाढले नाही, असा दावा महापालिकेने केला आहे. पालिकेने उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने १६४ बांधकाम व्यावसायिकांना नियमांचे पालन करण्यासाठी नोटिशीद्वारे सूचना दिल्या.

पालिकेने प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभाग स्तरावर निरीक्षण व कारवाईसाठी विशेष समित्या स्थापन करुन सहाय्यक आयुक्तांना बांधकाम थांबविण्याचा व त्वरित कारवाई करण्याचा अधिकार दिल्याने बांधकाम व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत. याशिवाय स्वच्छतेसाठी विविध यांत्रिकी उपाययोजना केल्याचा लाभ पनवेलमध्ये होताना दिसत आहे.

महापालिकेने चार फॉग कॅनन वाहने तैनात केली असून त्या माध्यमातून हवेतील धुलीकण कमी करण्यासाठी पाण्याचा फवारा केला जातो. या वाहनांनी दररोज २४० कि.मी. क्षेत्राचा परिसराची स्वच्छता केली जाते. तसेच रस्त्यांची स्वच्छता व पाण्याच्या फवारणीसाठी धूल प्रतिबंधक वाहनांचा वापर केला जातो. दिवाळीपूर्वी डीप क्लीन ड्राईव्ह सुरू करण्यात आले असून यासाठी शंभराहून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती पनवेल पालिकेचे उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी दिली.

न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार हवेची गुणवत्ता पाहता महानगरपालिका हवेतील धूलिकणाचे प्रदूषण कमी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे. यामुळे हवेतील गुणवत्ता निर्देशांकात सकारात्मक बदल दिसत आहे, असे पनवेल आयुक्त मंगेश चितळे म्हणाले.

# हुतात्मा वीर भाई कोतवाल स्मृतिदिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**| तळा | वार्ताहर |**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ आणि नाभिक समाज तळा यांचे संयुक्त विद्यमाने हुतात्मा वीरभाई कोतवाल स्मृतिदिनाचे औचित्य साधून वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे हे होते तर व्यासपीठावर संस्थेचे सचिव मंगेश देशमुख, मारुती शिर्के, महेंद्र कजबजे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, ज्युनियर कॉलेज प्राचार्य तथा मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, प्राथमिक विभाग मुख्याध्यापक सचिन भाटे, डॉ. भगवान लोखंडे, प्रा. नितीन पाटील, प्रा. डॉ थोरात, डॉ. दत्ता कुंटेवाड, डी टी आंबेगावे, भरत चाळके यांचेसह स्पर्धक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय अशा चार गटात स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यामध्ये जवळपास २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

प्राथमिक गट प्रथम श्लोक शिर्के, द्वितीय प्रज्ञा महाजन, तृतीय सई शिर्के, माध्यमिक गट इयत्ता पाचवी ते इयत्ता आठवीपर्यंत प्रथम हर्षल आंबेगावे, द्वितीय सई वावेकर, तृतीय तेजस्विनी भुरे, उत्तेजनार्थ नैतिक महाजन, माध्यमिक व उच्च माध्यमिक इयत्ता नववी ते इयत्ता बारावी गट प्रथम श्रावणी शिर्के, द्वितीय वैष्णवी खुटीकर, तृतीय आरिफा गोटेकर, उत्तेजनार्थ श्रावणी माळी, वरिष्ठ महाविद्यालय गट प्रथम शितल शिगवण, द्वितीय ध्रुव राऊत, तृतीय प्रज्ञा जाधव, उत्तेजनार्थ सानिया जाधव अशाप्रकारे पारितोषिक विजेते विद्यार्थी आहेत.

# तिसे येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**खांब :** रोहा तालुक्यातील तिसे येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण व साडेतीन दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ३२ वर्षांची यशस्वी परंपरा राखत व येथील ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच वीर हनुमान युवक मंडळ यांच्या सर्वोत्परी सहकार्याने व श्री. सोमजाई मातेच्या प्रतिष्ठापनेच्या बत्तीसाव्या वर्षीय वर्धापन दिनानिमित्ताने व या सप्ताहात ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण, प्रवचन, सामुदायिक हरिपाठ, हरीकीर्तन, हरिजागर आदी विविध अध्यात्मिक व धार्मिक, सामाजिक ज्ञानप्रबोधनात्मक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

# खाद्यतेलाच्या दरात ३० टक्के वाढ

**| पनवेल | वार्ताहर |**

स्थिर असलेले तेलाचे दर आता वधारले आहेत. सोयाबीन दरात वाढ झाल्याने आणि केंद्र सरकारने २० टक्के आयात शुल्क आकारल्याने तेलाच्या दरात ३० टक्के वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून आवक कमी होत आहे, त्यामुळे तेलाचे दर वधारले आहेत.

दोन वर्षांपूर्वी तेलाच्या दराने उच्चांक गाठला होता, मात्र हळूहळू तेलाचे दर पूर्ववत झाले होते. गेल्या कित्येक महिन्यांपासून तेलाचे दर स्थिरावले होते. परंतु आता पुन्हा तेलाच्या दराने उसळी घेतली आहे. सरकारने सोयाबीन, दर वाढवले आहेत, शिवाय २० टक्के आयात शुल्क लावल्याने दर वधारले आहेत. एपीएमसी बाजारात महिन्याला ७ ते आठ ८ टन तेलाची आवक होत असते मात्र मागणी वाढल्यामुळे तेलाचा पुरवठा कमी पडत आहे. त्यामुळे बाजारात तेलाची आवक ही कमी होत आहे, त्यामुळे ३० टक्के दर वधारले आहेत अशी माहिती एपीएमसी व्यापाऱ्यांनी दिली आहे.

एपीएमसी बाजारात तेलाची आवक कमी होत आहे. त्याचबरोबर सरकारने सोयाबीन दर वाढवल्यामुळे आणि केंद्र सरकारने २० टक्के आयात शुल्क आकारल्याने तेलाच्या दरात ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

# उरण-नेरुळ-बेलापूर रेल्वेवर फुकट्यांचा प्रवास

## दिवसाची एक लाखांची तिकीट विक्री ५० हजारांवर

**| उरण | वार्ताहर |**

१२ जानेवारी २०२५ ला उरण ते नेरुळ, बेलापूर हा लोकल मार्ग सुरू होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे. या कालावधीत मार्गावरील प्रवासी संख्येत वाढ झाली असली तरी या मार्गावरील फुकट्या प्रवाशांची संख्याही वाढू लागली आहे. दिवसाची १ लाखांची तिकिटविक्री आता ५० हजारांवर आली असल्याची माहिती रेल्वे विभागाकडून देण्यात आली आहे.

उरण ते नेरुळ, बेलापूर या मार्गामुळे उरणवरून नवी मुंबई आणि मुंबईत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना स्वस्त आणि जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. या मार्गाने दररोज ७ ते ८ हजार प्रवासी प्रवास करीत आहेत. दिवसेंदिवस या मार्गावरील प्रवासी संख्येत वाढ होत आहे. मात्र लोकल एका तासाच्या अंतराने असल्याने याचा या प्रवासमार्गाला फटका बसत आहे.

लोकलच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची मागणी केली जात आहे. त्यासाठी थेट केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आश्वासन दिले आहे. मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनीही अशाच



प्रकारचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे पुढील वर्षापासून उरण ते नेरुळ, बेलापूर या मार्गावरील लोकल अर्ध्या तासाच्या अंतराने सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. लोकलच्या फेऱ्यांत वाढ न झाल्याने उरण शहरातून नव्याने सुरू झालेल्या एनएमएमटी बस सेवेकडे प्रवासी वळू लागले आहेत.

**"सीसीटीव्हीची प्रतीक्षाच उरण स्थानकासह या मार्गावरील द्रोणागिरी, न्हावा शेवा व शेमटीखार या चारही स्थानकांच्या परिसरात सीसीटीव्ही बसविण्याची मागणी करूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. उरण येथून प्रवास करणारे ३० टक्के प्रवासी फुकटचा प्रवास करीत असावेत, कारण परतीचे तिकिट काढणाऱ्याची संख्या कमी झाली आहे.**

**-राजेश कुमार, मुख्य अधीक्षक, उरण रेल्वे"**

## नव्या वर्षात प्रकल्पाची वीट रचण्याचा संकल्प | विमानतळाशी सलग्न कामे लवकरच सुरू

# नैना प्रकल्पासाठी सिडकोचे शेतकऱ्यांना आवाहन

**| पनवेल | वार्ताहर |**

११ वर्षांपूर्वी जाहीर केलेल्या नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्र म्हणजे नैना प्रकल्प पुर्णत्वाकडे नेण्यासाठी सिडको महामंडळाच्या हालचालींना वेग आला आहे. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या सहकार्य आणि सहभागाची गरज असल्याचे मत सिडकोने मंगळवारी प्रसिद्धी पत्रक काढून जाहीर केले. यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन नव्या वर्षात नैना प्रकल्पाची वीट रचली जाईल अशी चिन्हे निर्माण झाली आहेत.

दोन दिवसांपूर्वीच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर पहिल्या व्यावसायिक विमानाची यशस्वी चाचणी घेतल्यानंतर सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी १७ एप्रिलला विमानतळ सुरू करण्याचा संकल्प व्यक्त केला. याचवेळी विमानतळाशी सलग्न असणाऱ्या नैना प्रकल्पाची कामे लवकरच सुरू केली जातील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नैना क्षेत्रात पनवेल तालुक्यातील ९२ तर उरणमधील दोन अशा ९४ गावांचा समावेश आहे. १० जानेवारी २०१३ पासून शासनाने अधिसूचित केलेल्या या क्षेत्रात कोणत्याही




बांधकामासाठी नैना बांधकाम परवाना विभागाकडून पूर्व परवानगी घेणे बंधणकारक केले आहे. हीच बांधकाम परवानगी मिळविण्यासाठी खर्चिक व डोकेदुखी ठरणारी प्रक्रिया असल्याने नैना क्षेत्रातील शेतकरी वैतागले आहेत.

मागील ११ वर्षात या परिसरात नैना प्राधिकरणाने कोणतीही सुविधा न दिल्याने शेतकरी संतापले आहेत. नैना हे देशभरातील गुंतवणूकदार आणि भागधारकांसाठी आकर्षणाचे केंद्र असले तरी येथील शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी सिडकोने पुढाकार घेतला आहे.

या परिसरातील अवैध बांधकामांमुळे काही प्रमाणात संभ्रम निर्माण झाल्याने मंगळवारी सिडकोने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात संबंधित संभ्रम दूर करण्यासाठी नगर नियोजन, परिवहन नियोजन, बांधकाम परवाने, अभियांत्रिकी, भूमी व भूमापन आणि नियंत्रक अनधिकृत बांधकामे या विभागांतील अधिकाऱ्यांना सक्रिय केल्याचा दावा सिडकोने केला.

नैना प्रकल्पाच्या धोरणानुसार नगर रचना परियोजनेअंतर्गत लँड पूलिंग मॉडेलद्वारे मूळ जमिनीच्या ४० टक्के क्षेत्रफळाचे विकसित, अंतिम भूखंड जमीनमालकांना मिळणार आहे. शेतकऱ्यांचे विस्थापन टाळण्यासाठी हे मॉडेल सिडकोने आणले आहे. बहुतेक शेतकऱ्यांचे अंतिम भूखंड त्यांच्या मूळ ठिकाणी देण्यात आल्याचा दावा सिडकोने केला आहे.

### विद्यमान नैना प्रकल्पाची स्थिती

**नगर रचना आणि २ ला शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. नगर रचना परियोजना ३ ते ७ ला प्राथमिक मंजुरी मिळालेली आहे, तर नगर रचना परियोजना ८ ते १२ साठी मसुदा योजनांकरीता लवादांची प्रक्रिया सुरू आहे. नगर रचना परियोजना १ आणि २ साठी प्रॉपर्टी कार्ड वितरणासाठी तयार आहेत आणि अंतिम भूखंडांचे हस्तांतरणही सोबतच शक्य आहे.**

# निवडक



## मधुकर पाटलांचा सेवापूर्ती सोहळा

**उरण :** शेतकरी कामगार पक्षाचे प्रामाणिक कार्यकर्ते, कामगार नेते मधुकर नामदेव पाटील हे जेएनपीए कंपनीतून ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाले. त्या निमित्ताने त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा व त्या प्रित्यर्थ मधुकर नामदेव पाटील यांनी स्व खर्चाने बांधलेला बेलपाडा जनसंपर्क कार्यालयाच्या प्रवेशदाराचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या कार्यक्रमाप्रसंगी पनवेल महानगर पालिकेचे माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, माजी आमदार बाळाराम पाटील, शेकापचे युवा नेते प्रितम म्हात्रे यांनी मधुकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जेएनपीए मल्टीपर्पज हॉल येथे झालेल्या सेवापूर्ती सन्मान सोहळा प्रसंगी पोर्ट अँड डाक महासंघाचे राष्ट्रीय महासचिव सुरेश पाटील, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत, केंद्रीय प्रभारी चंद्रकांत अण्णा धुमाळ, जेएनपीए विश्वस्त रवी पाटील, कामगार नेते रवि घरत, माजी प्राचार्य अरुण घाग, संघटक डी पी सोनावणे, उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत, रयत सेवक संघांचे नुरा शेख, जासई ग्रामपंचायतचे सरपंच संतोष घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांची पोलीस ठाण्याला भेट

**पनवेल :** पोलीस स्थापना दिनाच्या औचित्याने २ जानेवारी ते ८ जानेवारी २०२५ दरम्यान पोलीस रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येत असून त्याअंतर्गत आज पनवेल शहर पोलीस ठाणे येथे याकूब बेग विद्यालय, पनवेल येथील विद्यार्थ्यांच्या पोलीस ठाणे भेटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी वर्गाने पोलीस ठाणे कामकाजाची माहिती दिली. तसेच शस्त्रास्त्रांसंबंधी माहिती दिली. यावेळी १०० विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी हजर होते.



## वाढदिवशी विद्यालयास वॉटर कुलर व फिल्टर भेट

**पाली/गोमाशी :** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथील सहाय्यक शिक्षिका तन्मयी शिंदे यांच्या ५० व्या जन्मदिनाचे औचित्य साधून पार्वतीबाई महादेव शिंदे यांच्या स्मरणार्थ तुषार शिंदे व तन्मयी शिंदे यांच्याकडून नांदगाव विद्यालयास वॉटर कुलर व फिल्टर भेट देण्यात आली. यावेळी सर्व शिक्षक वृंदाकडून तन्मयी शिंदे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. नांदगाव विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वच्छ आणि थंड पाणी मिळावे या हेतूने वॉटर कुलर व फिल्टर दिले असे तुषार शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. वॉटर कुलरच्या उद्घाटन प्रसंगी तुषार शिंदे, तन्मयी शिंदे, पांडुरंग दिघे, प्राचार्य बबन पालवे आणि शिक्षक वृंद उपस्थित होते.



## पुस्तकांना मित्र बनवा-ॲड.नेने

**खरोशी :** 'वाचाल तर वाचाल...' या वाक्यात दडलेला मार्मिक अर्थ उलगडून सांगत विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी केले. यावेळी त्यांनी ग्रंथालयाने वाचकांसाठी अनुकुल, पुरक वातावरण निर्माण केले असल्याचे सांगत ग्रंथालयातील सुसज्जतेसाठी ग्रंथालय विभागाचे विशेष कौतुक केले. भाऊसाहेब नेने महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचे उद्घाटन पेण एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सदानंद धारप, संस्थेचे सदस्य श्रीराम दातार, ग्रंथपाल जी.जी.जोशी, डॉ.देविदास बामणे, विविध शाखांचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात ग्रंथालय व भाषा विभागाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृतीचे महत्त्व ठसविण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन, वाचनाचे महत्त्व सांगणारे बॅनर, वाचन सेल्फीपॉईंट आदीचा वापर करून ग्रंथालय सुशोभित करण्यात आले. प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात वाचनसंस्कृतीचे महत्त्व विशद केले.महाविद्यालयातील विद्यार्थीनी पूर्वा राजे ही सी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थिनीचा गौरव करण्यात आला.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• मेडिकल एजन्सीज पिंपळभाट येथे कामासाठी मुले व मुली १० वी ते १२ शिक्षण असलेल्या अलिबाग जवळील राहणाऱ्या स्टॉफची जागा खाली आहे. व Driver ची जागा खाली आहे. मो. ९६२३३६६७७८

• जमिनीची खरेदी व विक्री अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८०३

• अलिबाग येथे कंस्ट्रक्शन कंपनी साठी पिकअप वर ड्रायव्हर पाहिजे ८८०६७५९०९०, ९६२३६८७१५७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. मुकुंद बलवंत देशमुख, रा. मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ७४ | २ | १-१०-३० | ८.१३ |

पैकी विक्री केलेले क्षेत्र ०.९०.३०

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.३/१/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस एल. एल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड.**

| अनु. नं. | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | विद्यमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) | १७०/१/२ | ०-४०-०० | ०.५५ | श्री.केसरीनाथ जगन्नाथ पाटील |
| २) | १७०/२ | ० २९-५०<br>पो.ख.०-१०-५०<br>एकूण०-४०-०० | ०.५३ | प्रमिला केसरीनाथ पाटील |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीठी तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३/१/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०१ २०१.

**अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे कोर्टात**
**मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ ग,**
**पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस**

## नोटीस

दावा क्रमांक १०/२०२४

श्री. अशोक लक्ष्मण शेळके
सर्व रा. आगरआळी - आग्राव — वादी/ अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

१. मिरा गजानन आचार्य
२. सोनाली अजित देशमुख — प्रतिवादी/सामनेवाला
३. श्री. समीर गजानन आचार्य
रा. मु. पो. चौल
ता.अलिबाग, जि.रायगड

विषय- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ओ प्रमाणे

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग.नं. | स.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| मौजे चौल | १६६२/१ | ४३३/४ | ०-३४-००<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण ०-३८-०० | ०.६६ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि. ०३/०७/२०२४ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख-१७/०१/२०२५ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न रहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ३१/१२/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**अलिबाग- रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आंबेघर, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नं. २/६, क्षेत्र ०-१४-२० हे.आर., पो. ख. ०-०५-८० हे. आर. एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर., आकार ०.२६ रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक महेंद्र सुरेंद्र जोशी रा. मु. चरी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०२/०१/ २०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता -श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## पाहिजेत

महाराष्ट्र शासन आदेशान्वये मा. शिक्षणाधिकारी यांचे पत्र क्र. जा.क्र. राजिप /शिक्षण/ माध्य/टी.एन.टी.-२/२०२४/४१४१ दिनांक ३१/१२/२०२४ नुसार तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या श्री गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर, तळा ता. तळा, जि. रायगड या माध्यमिक शाळेकरीता खालील पात्रतेच्या शिक्षकेतर कर्मचारी 'कनिष्ठ लिपीक' या पदासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून नियुक्ती करावयाची आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने आपल्या मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी शुक्रवार दि. १०/१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा श्री गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर, तळा ता. तळा, जि. रायगड या शाळेच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पद | माध्यम | शैक्षणिक पात्रता | संवर्ग | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ लिपिक | मराठी | एच.एस.सी.बी.कॉम(प्राधान्य)<br>संगणक कोर्स सी.सी.सी.<br>किंवा एम.एस.सी.आय.टी.<br>मराठी व इंग्रजी टंकलेखन आवश्यक | खुला | ०१ |

**अध्यक्ष/सचिव,**
**तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ,**
**ता. तळा, जि. रायगड. ४०२१११.**

दि. ०२/०१/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक राजाराम रामचंद्र पाटील, सुहास शिवराम पाटील, प्रविण शिवराम पाटील, स्मिता दिलीप घरत, संगीता गणेश पाटील, स्नेहलता शिवराम पाटील यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| पेझारी ता. अलिबाग | ८०/५/अ | ०-३९-००<br>पो.ख. ०-०२-२०<br>एकुण ०-४१-२० | ४.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी ०-३७-२० हे. आर. या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड. प्रतिज्ञा विनायक पाटील**
मु. नवजीवन पेझारी, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९६२३२९२७६८

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात**

संध्या विलास पाटील ....अपिलार्थी
विरुद्ध
सुरेश गंगाराम पाटील मयत तर्फे वारस ...उत्तरार्थी
स्वाती सुरेश पाटील

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीत वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात आरटीएस अपिल क्र.७२/२०२३ दाखल केले आहे.

| गावाचे नांव | ग.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे शहापूर, ता. अलिबाग | २४८/३ | ०-४७-६०<br>पो.ख. ०-००-७०<br>एकूण ०-४८-३० | ५.९४ |
| | २४८/४ | ०-३१-०१ | ४.३७ |

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

**उत्तरार्थींचे नाव :**

१. श्री. कै. सुरेश गंगाराम पाटील मयत तर्फे वारस ... उत्तरार्थी
१/१) स्वाती सुरेश पाटील
१/२) संदीप सुरेश पाटील
१/३) स्मिता सुरेश पाटील
क्र. १/१ ते १/३ रा. द्रोणागिरी नोड-रो हाऊसेस,
ता. उरण, जि. रायगड ४०० ७०२
२. श्री. विजय गंगाराम पाटील
रा. हिरानंदानी कॉम्प्लेक्स, १८ वा मजला,
भोकरपाडा, रसायनी पिन नं. ४१० २२२
३. श्री. संजय गंगाराम पाटील
रा. केशव कृपा, टिळक रोड, मारुती नाका,
ता. अलिबाग, जि. रायगड
४. श्रीम. शैलजा गंगाराम पाटील
रा. शांती सागर, पाण्याचे टाकी जवळ, बाजारपेठ,
राममंदीर रोड, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४
५. श्रीम. प्रतिभा गंगाराम पाटील
रा. मु.पो. शहापूर, ता. अलिबाग, जि. रायगड

सदर आरटीएस अपिल क्र.७२/२०२३ अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि.०३/०२/२०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वत: किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
**(मुकेश चव्हाण)**
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग

दिनांक : ०२/०१/२०२५

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती माधुरी मोहन कोचरेकर (पूर्वाश्रमीची सुरेखा चंद्रकांत हळदणकर), रा. ए. १३ कृष्णा कॉलनी बाबुलपाडा, आचोळे रोड गाला नगर नालासोपारा, पूर्व, साई मंदिराच्या जवळ, वसई, ठाणे ४०१ २०९ ह्यांनी त्यांचा भाऊ श्री. सुबोध चंद्रकांत हळदणकर यांना दिनांक १२/१०/२०२० रोजी खालील वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील रजिस्टर 'अखत्यारपत्र'(पॉवर ऑफ ॲटर्नी) दिलेले होते. ज्याचा रजिस्टर असा आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| टेकाळी | ७६ | ०१-९७-२०<br>पो.ख. ०-७६-३०<br>०२-७६-५० | ३१.३८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीत आमचे अशिलांचा असलेला अविभाज्य असा हिश्या संदर्भात दिलेली पॉवर ऑफ ॲटर्नी माझे अशिलांनी रद्द केलेली आहे. या करीत माझे अशिलांतर्फे मी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

सदर वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील अखत्यारपत्र (पॉवर ऑफ ॲटर्नी) ह्यापुढे रद्द असून त्या अखत्यारपत्राद्वारे (पॉवर ऑफ ॲटर्नी) श्री. सुबोध चंद्रकांत हळदणकर यांना कोणतेही अधिकार राहिलेले नाहीत असे माझे अशिल जाहिर करतात. तरी सदर अखत्यारपत्राचा (पॉवर ऑफ ॲटर्नीचा) श्री. सुबोध चंद्रकांत हळदणकर यांनी वापर करुन माझे अशिलांचे वतीने कोणाबरोबर ही कोणताही व्यवहार करू नये. रद्द केलेल्या अखत्यार पत्राचा वापर करून केलेला व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही तसेच रद्द केलेल्या अखत्यारपत्राचा वापर करून कोणाचे काही नुकसान झाल्यास त्यास माझे अशिल जबाबदार राहणार नाही. याची कृपया सर्व जनतेने नोंद घ्यावी. श्री. सुबोध चंद्रकांत हळदणकर यांस यापुढे वर वर्णन केलेल्या मिळकतीचे दिलेल्या अखत्यारपत्राद्वारे (पॉवर ऑफ ॲटर्नी) कोणतेही अधिकार राहिलेले नाहित व त्यांनी सदर अखत्यारपत्राचा वापर करुन केलेले कोणतेही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहित असे माझे अशिल जाहीर करतात. तसेच आमचे अशिलांनी ह्यापुर्वी कोणालाही सदर मिळकती संदर्भात अखत्यारपत्र दिलेले नाही तरी यदाकदाचीत असे कोणतेही अखत्यारपत्र केलेले असल्यास तेही या नोटीसीद्वारे आमचे अशिल रद्द करत असल्याचे जाहिर करतात. या नोटीसद्वारे जाहिर करीत आहेत.

दिनांक : ०२/०१/२०२५

सही/-
**ॲड. कांचन प्रशांत नार्वेकर**
ॲकॉन क्लासिक फ्लॅट नं. १०६
जिल्हा न्यायालयाचे समोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ९८५०७५०८३४

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मधु विनोद ओसवाल व ३ यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं . | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६७ | १ | ०-२८-२० | ०-३९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०३/०१/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं. २, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९९२१७२२२००

दिनांक ०२-०१-२०२५

## जाहीर नोटीस

आमचे अशील श्री विश्वनाथ जानू काठे, राहणार म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून व कागदपत्रावरून तसेच सांगण्यावरून माझे अशिलातर्फे दिनांक २७/१२/२०२४ रोजी दैनिक कृषिवल अलिबाग पेपर मध्ये मौजे म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड, गट न. १९० क्षेत्र (हे.आर.) २.५४.७० पो. ख. ०.४१.५० एकूण २.९६.२० देण्यात आलेल्या नोटीशीस हरकत आहे कळवणे ते खालीलप्रमाणे ;-

मौजे म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड, गट. नं.१९० क्षेत्र (हे. आर.) २.५४.७० पो. ख. ०.४१.५० एकूण २.९६.२० या मिळकतीची दि.२७/१२/२०२४ रोजी दैनिक कृषिवल पेपर मध्ये देण्यात आलेल्या नोटीशीस हरकत आहे. दिनांक २७/१२/२०२४ रोजी दैनिक कृषिवल पेपर नोटिस मध्ये नमूद केलेल्या इसमामध्ये आमचे अशील श्री विश्वनाथ जानू काठे, राहणार म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड, गट. नं. १९० क्षेत्र (हे.आर.) २.५४.७० पो. ख. ०.४१.५० एकूण २.९६.२० मध्ये यांचे मालक म्हणून नावाची नोंद केलेली नाही. सदर मिळकतीमध्ये मालक श्री विश्वनाथ जानू काठे हे आहेत, त्याचे ७/१२ पत्रकी नाव आहे. त्यामुळे देण्यात आलेली नोटिस बेकायदेशीर आहे. आमचे अशील श्री विश्वनाथ जानू काठे राहणार - म्हात्रोळी ता. अलिबाग मिळकत मोजे म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड, गट नं. १९० क्षेत्र अ हे आर. २.५४.७० पो. ख. ०.४१.५० एकूण २.९६.२० मध्ये यांचे मालक म्हणून नोंद असल्याने सदर मिळकतीचे सरसनिरस वाटप झाले नाही, सदर मिळकत कोणत्या दिशेकडील आहे हे नमूद नाही. त्यामुळे सदर मिळकतीचे नोटिस व व्यवहार हा बेकायदेशीर आहे. मौजे म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड, गट. नं. १९० क्षेत्र अ हे. आर. २.५४.७० पो. ख. ०.४१.५० एकूण २.९६.२० मध्ये मिळकतीची सरकारी मोजणी न झाल्याने, विभागणी न झाल्याने अविभक्त हिस्सा कोणता हे नक्की न झाल्याने सदर देण्यात आलेली नोटिस व साठेकरार बेकायदेशीर आहे. त्यामुळे तसा व्यवहार करण्याचा हक्क व अधिकार नाही. त्यामुळे मौजे म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड, गट. नं. १९० क्षेत्र अ हे. आर. २.५४.७० पो. ख. ०.४१.५० एकूण २.९६.२० मध्ये करण्यात आलेला साठेकरार रद्द करून आमचे अशिलास लेखी कळवण्यात यावे व तुम्ही दिनांक २७/१२/२०२४ रोजी दैनिक कृषिवल अलिबाग पेपर मध्ये देण्यात आलेल्या नोटिस रद्द करून घ्यावी.

सदर मिळकतीचा वाद हा मा. न्यायालयात स्पे. मु. न. १६/२०२४ ने प्रलंबित आहे व सदर मिळकतीचा मालकी हक्क व ताबा माझे अशिलांकडे असल्याने सदरचा विक्रीस माझ्या अशिलाची सक्त हरकत आहे. त्यामुळे सदर मिळकत मौजे म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड, गट. नं. १९० क्षेत्रअ हे. आर. २.५४.७० पो. ख. ०.४९.५० एकूण २.९६.२० चा व्यवहार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मिळकत रजिस्टर करून घेणार व देणार तसेच त्यामध्ये सहभागी असणाऱ्यांवर राहील तसेच त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी लागेल व त्याचे होणाऱ्या खर्चास, परिणामास जबाबदार असतील त्यामुळे सदरचा व्यवहाराचे रजिस्टर करण्यास हरकत आहे कळावे.

अलिबाग,
दिनांक : ०२-०१-२०२५

**(श्री. जितेंद्र व्ही भगत)**
ॲडव्होकेट

**asREC (India) Limited**
बिल्डिंग क्र. २, युनिट क्र. २०१-२०२ए आणि २००-२०२बी, तळ मजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३.

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि नियम ९ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना.**

ज्याअर्थी

एएसआरईसी (इंडिया) लि. ही सिक्युरिटायझेशन ॲण्ड ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (यानंतर ''एएसआरईसी'' असा उल्लेख) आणि भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. सह निष्पादित दिनांक २५.०३.२०२१ रोजीच्या अभिहस्तांकन कराराच्या सुकृताद्वारे मे. सी के एंटरप्रायझेस (मालक) श्री. चैतन्य राजाराम कालबाग, संयुक्त/सह-कर्जदार श्रीम. मधुश्री चैतन्य कालबाग आणि मयत श्रीम. नेत्रा अंजन कुलकर्णी (कर्जदार) यांचे कायदेशीर वारसदार मार्फत म्हणजेच (१) श्रीम. रश्मी व्ही. रेगे, (२) श्रीम. स्वप्ना जी. वेलिंग, (३) श्री. निलेश कुलकर्णी आणि (४) श्री. दुर्गेश ए. कुलकर्णी यांची तारण धनको आहे आणि मूळ धनको भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. यांचेकडुन मे. सी. के. एंटरप्रायझेस (प्रोप्रा) श्री. चैतन्य राजाराम कालबाग यांचे तारण कर्ज संपादित केले आहे.

भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या विहित कालावधीत कर्जदार, संयुक्त/सहकर्जदार/हमीदार यांना भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. द्वारे मंजुर केलेल्या अग्रिमांच्या संदर्भात वसुली काही असल्यास समायोजित करुन त्यावरील पुढील व्याजासह ३१.०१.२०२१ रोजीसची रु. १,३२,७४,९४३.४० (रुपये एक कोटी बत्तीस लाख चौऱ्याहत्तर हजार नऊशे त्रेचाळीस आणि पैसे चाळीस मात्र) ची एकूण थकबाकी रक्कम प्रदान करण्यासाठी वरील कर्जदार मे. सी के एंटरप्रायझेस (मालक) श्री. चैतन्य राजाराम कालबाग, संयुक्त/सह-कर्जदार श्रीम. मधुश्री चैतन्य कालबाग आणि मयत श्रीम. नेत्रा अंजन कुलकर्णी (कर्जदार) यांचे कायदेशीर वारसदार मार्फत म्हणजेच (१) श्रीम. रश्मी व्ही. रेगे, (२) श्रीम. स्वप्ना जी. वेलिंग, (३) श्री. निलेश कुलकर्णी आणि (४) श्री. दुर्गेश ए. कुलकर्णी यांना बोलाविण्यासाठी सदर ॲक्टच्या कलम १३(२) अन्वये दिनांक ०४.०२.२०२१ रोजीची मागणी सूचना जारी केली होती.

कर्जदार, संयुक्त कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांनी दिनांक ०४.०२.२०२१ रोजीच्या मागणी सूचनेनुसार परतफेड करण्यात कसूर केल्याने कर्जदार तुमच्यावर बजावलेल्या सदर ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत आणि सिक्युरिटी (इंटरेस्ट) रुल्स, २००२ च्या कलम १३(४) प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन एएसआरईसी (इंडिया) लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी १९.०४.२०२३ रोजी येथील खालील परिशिष्टात अधिक विशेषत: वर्णिलेल्या मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा घेतला आहे.

दिनांक २५.०३.२०२१ रोजीच्या अभिहस्तांकन कराराला अनुसरुन एएसआरईसी (इंडिया) लि. ने सरफैसी ॲक्टच्या कलम ५ अंतर्गत त्यातील तारण हितसंबंधासह एकत्रित सर्व हक्क, नामाधिकार आणि हितसंबंधासह भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. कडुन वरील सदर कर्जदारांच्या वित्तीय मत्ता संपादित केल्या आहेत.

वरील नमुद कर्जदार/संयुक्त/सह-कर्जदार/हमीदार यांनी मागणी सूचनेनुसार संपूर्ण थकबाकीचे प्रदान करण्यास कसूर केल्यामुळे आणि एएसआरईसी (इंडिया) लि. च्या नावे भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. द्वारे वरील सदर अभिहस्तांकनाला अनुसरुन एएसआरईसी (इंडिया) लि. चे प्राधिकृत अधिकारी खात्यामधील आमच्या थकबाकीच्या वसुलीकरिता खालील नमुद मिळकत विकण्यास इच्छुक आहेत.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार/संयुक्त सह-कर्जदार/हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, एएसआरईसी (इंडिया) लि. चे प्राधिकृत अधिकारी याद्वारे थकबाकीची वसुलीसाठी खालील नमुद तारण मिळकत विकण्यास इच्छुक आहेत आणि म्हणून तारण मिळकतींच्या खरेदीसाठी मोहोरबंद लिफाफ्यातुन निविदा/बोली मागवित आहेत. मिळकतीची विक्री काटेकोरपणे **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय''** तत्त्वाने करण्यात येईल.

| तारण मत्तेचे वर्णन | राखीव किंमत (रु. लाखात) | इअर (रु. लाखात) | बोली वाढविणे (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| श्रीम. नेत्रा अंजन कुलकर्णी आणि श्रीम. मधुश्री चैतन्य कालबाग यांच्या मालकीचे गाव चाऊल, अलिबाग चा उत्तर तालुका, जिल्हा रायगड चा गट क्र. १३७ए (जुने सर्व्हे क्र. (३७ए/२)/३ आणि (३७ए/२)/४ येथे स्थित जमीन, मोजमापित ०-०६-० हेक्टर त्यावरील बांधकामित बंगला, मोजमापित ४,५०० चौ. फू. आणि ग्राम पंचायत घर क्र. ५३८ | ९२.०० | ९.२० | १.०० |

**लिलावाचा तपशिल :**

**लिलावाची तारीख आणि वेळ** : २८.०१.२०२५ रोजी स. ११.०० वा.

**मिळकतीचे निरिक्षण:** २१.०१.२०२५ रोजी दु. १२.०० पासून दु. ०३.०० वा. पर्यंत

**बोली प्रपत्र प्राप्त करणे** : ०३.०१.२०२५ पासून २७.०१.२०२५ पर्यंत. स. १०.०० वा. ते दु. ०४.०० वा.

**बोली प्रपत्र सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** २७.०१.२०२५ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत

**बोली प्रपत्र प्राप्त करण्याचे/सादर करण्याचे ठिकाण आणि लिलाव आणि बोली उघडण्याची ठिकाण :** २०० ए-२०१ आणि २००बी-२०२, बिल्डिंग क्र. २, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई-४०००९३ येथील एएसआरईसी (इंडिया) लि. च्या नोंदणीकृत कार्यालयातुन. निविदा प्रपत्र एसआरईसी (इंडिया) लिमिटेडची वेबसाईट (www.asrecindia.co.in) वरुन सुध्दा डाऊनलोड करण्यात येतील. लिलावाची तारीख आणि ठिकाण : एएसआरईसी ला प्राप्त झालेले प्रस्ताव/निविदा २८.०१.२०२५ रोजी स. ११.०० वा. आमच्या वरील नमुद कार्यालयात प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे उघडण्यात येतील, जेथे अंतर्गत बोली घेण्यात येईल.

**अटी आणि शर्ती:**

१. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिलेले तपशिल हे त्यांचे चांगले ज्ञान आणि माहितीनुसार तेथे मिळकतीवरील कोणताही भार प्राधिकृत अधिकाऱ्यांना माहित नाही. तथापी इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीला बाधक दावे/हक्क/थकबाकी आणि लिलावासाठी ठेवलेल्या मिळकतीचे नामाधिकार, बोजा संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे. ई-लिलावाची जाहिरात ही काही घटक नाही आणि एएसआरईसी चे कोणतेही सादरीकरण किंवा कोणतेही वचन मानण्यात येऊ नये. मिळकत एएसआरईसी ला ज्ञात किंवा अज्ञात विद्यमान बोजासह विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/मतांकरिता जबाबदार राहणार नाही.

२. ई-लिलाव हा ''जे आहे जेथे आहे'', जे आहे जसे आहे'' आणि जे काही आहे'' आणि विना अवलंब तत्वाने'' वरील नमुद नुसार संपूर्ण मिळकतीसाठी करण्यात येणार आहे.

३. निविदा दस्तावेजांमध्ये दिलेल्या विहित स्वरुपातील बोली याखाली दिलेल्या तपशीलानुसार आरटीजीएस च्या मार्गे डिमांड ड्राफ्ट किंवा फंड ट्रान्सफर स्वरुपात १०% इअर रकमेसह एएसआरईसी (इंडिया) लि. चे प्राधिकृत अधिकारी, बिल्डिंग क्र. २, युनिट क्र. २०१-२०२ए आणि २००-२०२बी, तळमजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३ यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणामुळे **२७.०१.२०२५ रोजी सायं. ५.००** नंतर प्राप्त झालेले बोली प्रपत्र किंवा इअर विचारात घेतली जाणार नाही. इअरशिवाय बोली तडकाफडकी नाकारण्यात येईल.

४. यशस्वी बोलीदारांची इसारा अनामत रक्कम (इअर) ही विक्री मोबदल्याचा भाग म्हणुन राखुन ठेवण्यात येईल. आणि अयशस्वी बोलीदारांची इअर त्याच पध्दतीने परत करण्यात येईल. इअरवर व्याज देय नाही. बोलीदारांना त्वरित सुविधा आणि योग्य परताव्याकरिता त्यांच्या बँक खात्याचा तपशिल देण्याची विनंती करण्यात येत आहे.

५. यशस्वी बोलीदारांनी त्वरित म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या अगोदर विक्री किंमतीची २५% रक्कम (जमा केलेली इअर रक्कम धरून) प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे जमा केली पाहिजे आणि असे जमा करण्यात कसूर केल्यास इअर जप्त करण्यात येईल आणि मिळकतीची पुन्हा विक्री करण्यात येईल.

६. विक्री किंमतीच्या उर्वरित ७५% रक्कम मिळकतीच्या विक्री निश्चितीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा तारण धनको व यशस्वी बोलीदार यांच्यात लेखी मान्य केल्या जाणाऱ्या वाढीव मुदतीत प्रदान करावी लागेल. वरील विहित कालावधीत प्रदानात कसूर केल्यास जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि मिळकतीची पुन्हा विक्री करण्यात येईल आणि कसूरवार खरेदीदाराला मिळकत किंवा त्यानंतर विकण्यात येणाऱ्या रकमेवरील सर्व दावे त्यागावे लागतील.

७. विक्री सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमांच्या अंतर्गत विहित नियम/अटीचच्या अधीन राहिल.

८. इअर रकमेशिवाय आणि/किंवा राखीव किमतीच्या खालील बोली स्विकारण्यात/निश्चित करण्यात येणार नाहीत.

९. इच्छुक खरेदीदार/बोलीदाराने एकतर **खाते क्र. ००९०२०११०००१५१७, बँक ऑफ इंडिया, एसएसआय, अंधेरी शाखा, आयएफएससी कोड : BKID0000090 लाभकारीचे नाव: एएसआरईसी पीएस-१२/२०२०-२१ ट्रस्ट** मध्ये एनईएफटी/आरटीजीएस मार्फत किंवा मुंबईमध्ये देय आणि कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेवर काढलेल्या **''एएसआरईसी पीएस-१२/२०२०-२१ ट्रस्ट'' च्या नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्टच्या** स्वरुपात इअर जमा करणे आवश्यक आहे.

१०. इच्छुक बोलीदार **२१.०१.२०२५ रोजी दु. १२.०० ते दु. ०३.००** पर्यंत मिळकतीचे निरिक्षण करु शकतात करु शकतात. संपर्क तपशिल: श्री. ए. जगन्नाथ राव - सेल क्र. ९८९२९११२४१, ०२२-६१३८७०३६, श्री. हर्षद व्ही.- सेल क्र. ९५९४६९२२५१, ०२२-६१३८७०५७, यांना कोणत्याही चौकशीसाठी संपर्क करता येईल.

११. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही कारण न देता कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव/बोली स्वीकारणे किंवा नाकारणे आणि/किंवा कोणत्याही अटी/शर्ती सुधारण्याच्या सर्वस्वी हक्क राखुन ठेवला आहे.

१२. यशस्वी बोलीदाराने कायद्यानुसार लागू नोंदणीकरिता देय प्रभार/शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, अनुषंगिक खर्च, इ.भरायची आहेत.

१३. विक्रीच्या अटी आणि शर्तीचे पालन केल्यावर आणि प्राधिकृत अधिकाऱ्यांनी विक्री निश्चित केल्यावर यशस्वी बोलीदारांच्या नावे **विक्रीचे प्रमाणपत्र** जारी करण्यात येईल.

१४. कोणत्याही कारणाने नियोजित लिलाव कार्यक्रम न होऊ शकल्यास एएसआरईसीला सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्सच्या नियम ८(५) आणि सरफैसी ॲक्ट २००२ च्या तरतुदींच्या अंतर्गत किंवा **खाजगी कराराने** सदर सूचनेमार्फत लिलावाच्या अंतर्गत असलेल्या तारण मत्ता विकण्याचा हक्क आहे.

१५. उच्च्वतम बोली ही तारण धनको/प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या मंजुरीच्या अधीन राहील.

सदर सूचना ही त्यांची संपूर्ण थकबाकी चुकती न केल्यास वरील नमुद तारखेस सरफैसी ॲक्टच्या नियम ८(६) आणि ९(१) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स अंतर्गत तारण मिळकतीच्या विक्रीकरिता कर्जदार आणि संयुक्त/सहकर्जदार/हमीदार यांना **१५ (पंधरा) दिवसांची** सूचना सुध्दा आहे.

**दिनांक : ०३.०१.२०२५**
**ठिकाण : अलिबाग**

**सही/- प्राधिकृत अधिकारी,**
**एएसआरईसी (इंडिया) लि.**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज २२७/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. मुअज्जम अब्दुल रज्जाक नखतारे,
रा. मु. पो. मजगांव, ता. मुरुड, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत मजगांव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्री. मुअज्जम अब्दुल रज्जाक नखतारे, यांचा जन्म दि. १०/०७/१९७१ रोजी राहत्या घरी मौजे मजगांव, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मजगांव, कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्री. मुअज्जम अब्दुल रज्जाक नखतारे, यांचा जन्म दि. १०/०७/१९७१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयांत दि. ११/०२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०१/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल दिपाली दिलीप म्हात्रे रा. पेण, खाली नमुद केलेली सर्व्हे वर्णनाची मिळकत गांव निगडे, ता पेण, जि रायगड येथील गट नंबर ५२/४, क्षेत्र ०.४५.००, पो ख ०.८.००, एकूण ०.५३.०० हि १. जगदिश बळीराम पाटील व २. बळीराम हरी पाटील रा मुंबई गोवा महामार्ग पाटणी पांडापूर पो.कासू ता. पेण, जि. रायगड मालकांकडून खरेदीखताने विक्रीत घेण्याचे ठरविले आहे तरी सदर जमीन मिळकती संदर्भात कोणाची खरेदी, बक्षीस, दान, पोटगी, भाडेपट्टा, लीज, गहाण, कब्जा, विरुद्ध कब्जा वा अन्य कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध असल्यास व सदरील वर जमीन मिळकतीच्या नियोजीत खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास ती हरकत हक्कासंबंधाच्या योग्य त्या कागदपत्रांनिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सकाळी ९ ते ११ ह्या वेळेत हरकतीच्या कागदपत्रांसह समक्ष येऊन हरकत नोंदवावी. अशी हरकत न आल्यास आमचे अशील सदर मिळकतीच्या मालकांबरोबर खरेदीखत पूर्ण करतील व मागावुन कोणतीही तक्रार चालणार नाही ह्याची कृपया समज द्यावी म्हणून दिली जाहिर नोटीस.

स्थळ पेण
दिनांक ३१/१२/२०२४

**ॲड. रजनी पाटील**
मु पो. पेझारी ता. अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत ही माझे अशील श्री. सुरेश रघुनाथ म्हात्रे व श्री विजय रघुनाथ म्हात्रे यांचे वडीलोपार्जीत वारसाहक्काने आलेली मिळकत असून त्यामध्ये माझे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. या मिळकतीबाबत दिवाणी कोर्टात माझे अशिलांनी रे.मु नंबर ४७/०९ हा दावा वाटप करून मिळण्याकरीता दाखल केला होता. या दाव्यामध्ये माझे अशीलाचे लाभात कोर्टाने निर्णय दिलेला असून कोर्टाचे निर्णयानुसार सदर मिळकतीमध्ये माझे अशिलाना अविभक्त हिस्सा कोर्टाने जाहीर केला आहे. व सदर हिस्सा वाटप करून मिळण्याकरीता आता या मिळकतीबाबत दिवाणी कोर्टात दरखास्तीचे काम चालु आहे. सदरची मिळकत दिवाणी कोर्टात दाव्याचे काम चालु असताना त्या दाव्यातील प्रतिवादी यांनी विक्री केली आहे व आता या मिळकतीचे ७/१२ सदरी सोबो इस्टेट डेव्हलपमेंन्ट प्रा.ली. यांचे नाव दाखल आहे. मात्र दिवाणी कोर्टाच्या निर्णयानुसार या मिळकतीमध्ये माझे अशिलांचा हिस्सा जो जाहीर झाला आहे तो अबाधीत आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | ग.न. | हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| धोकवडे | २०५ | - | ०-८४-८०<br>०-०३-००<br>०-८७-८० | ३.६१ |

सदर मिळकतीमध्ये आता आपले नाव मिळकतीचे ७/१२ सदरी आहे या गोष्टीचा गैरफायदा घेत सोबो इस्टेट डेव्हलपमेन्ट प्रा.ली.हे संपुर्ण मिळकतीची विक्री करण्याच्या मिळकतीचे स्वरूप बदलण्याच्या तसेच मिळकतीमध्ये बांधकाम सुरू करण्याच्या प्रयत्नात आहे असे माझे अशिलांना समजले आहे. या मिळकतीपैकी माझे अशीलांचे हिश्याचे अविभक्त क्षेत्राबाबत सोबो इस्टेट डेव्हलपमेन्ट प्रा.ली.यास कायद्याने कोणताही मालकी हक्क प्राप्त झालेला नाही व त्यास सदर माझे अशिलांचे मालकीचे असलेले अविभक्त क्षेत्र कोणासही विक्री करण्याचा, त्यात भराव करणे, बांधकाम करण्याचा काहीही कायदेशीर हक्क वा अधिकार नाही, ही बाब तमाम लोकाना अवगत करण्याकरीता माझे अशिलातर्फे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सबब सर्व लोकांस याद्वारे कळविण्यात येते की, या मिळकतीबाबत सोबो इस्टेट डेव्हलपमेन्ट प्रा.ली. यांचे सोबत कोणीही कसलाही साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही व्यवहार करू नये अथवा मिळकतीमध्ये कोणताही हक्क, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, असा हितसंबंध निर्माण करू नये, या उपरही कोणी असा काही व्यवहार करार मदार केल्यास सदर व्यवहार हा माझे अशिलाचे कोर्टाने दिलेले न्यायनिर्णयानुसारचे अविभक्त हिश्यावर बंधनकारक रहाणार नाही, व यानंतर अशा प्रकारे मिळकत विकत घेणार व्यक्ती '' बोनाफाईड पर्चेसर फॉर व्हॅल्यु विदाउट नोटीस'' असा बचावही घेऊ शकणार नाही, याची सर्वानी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक १४/१२/२०२४

स्वाक्षरीत / -
Cjayant Law Office
**ॲड. जयंत ह. चेऊलकर**
२०१. सृष्टी, २ रा मजला. वेधशाळेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड

# निवडक



## क्रीडा पुरस्काराने सन्मानित

**म्हसळा :** म्हसळा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक वरवठणे शाळेच्या उपक्रमशील आणि क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य असणाऱ्या शिक्षिका पनिता गावित यांना सन २०२४-२५च्या आदर्श क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. म्हसळ्यातील अंजुमन शाळेत ३१ डिसेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमात तहसीलदार सचिन खाडे यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी, गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, वरिष्ठ विस्ताराधिकारी अ.बा. मोरे, कनिष्ठ विस्ताराधिकारी बशीर ऊल्डे, केंद्र प्रमुख नरेश सावंत, किशोर मोहिते, गट समन्वयक अण्णासाहेब बिचुकले, भानुदास राठोड, महादेव पवार, महेश विचारे, राहुल नाईक, तालुका क्रीडा अध्यक्ष डावखर, क्रीडा समन्वयक हालसंगी, तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख व सर्व क्रीडाशिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते.



## क्रीडा क्षेत्रावर दुःखाचा डोंगर

**माण :** माण तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रावर दुःखाचा डोंगर कोसळावा, अशी अतिशय दुःखद घटना घडली आहे. मलवडीचा युवा पैलवान जय दीपक कुंभार (१४) याचे आकस्मिक निधन झाले आहे. येथील हॉटेल व्यावसायिक दीपक कुंभार यांनी आपल्या मुलाला म्हणजेच जयला पैलवान बनवायचे या ध्येयाने जय याला लहानपणापासून घडवले. जयला झिरपवाडी व तिथून पुढे पुणे येथील जाणता राजा कुस्ती संकुल येथे सराव व प्रशिक्षणासाठी ठेवले होते. शालेय कुस्ती स्पर्धेत सलग दोन वर्षे त्याने १४ वर्षे वयोगटात राज्यपातळीवर तिसरा क्रमांक मिळवला. तर, २०२४ ला १७ वर्षे वयोगटात ६२ किलो वजनीगटात विभाग पातळीवर तिसरा क्रमांक मिळवला. नुकत्याच झालेल्या श्री खंडोबा यात्रेनिमित्त आयोजित मलवडीच्या कुस्ती मैदानात नेत्रदीपक कुस्ती करत प्रेक्षकांची वाहवा मिळवली. महाराष्ट्र केसरीसह ऑलिम्पिक पदक मिळवायचे हे ध्येय घेऊन वाटचाल करत असलेल्या जयसह दिपक कुंभार यांचे स्वप्न भंगले. सकाळच्या सुमारास सराव केल्यानंतर आकस्मिक जय याचे निधन झाले.



## स्वप्निल कुसाळेचा सन्मान

**नवी दिल्ली :** नेमबाज स्वप्निल कुसाळेने पॅरीस पॅरालिम्पिक २०२४ स्पर्धेत भारतासाठी कांस्यपदक जिंकले. त्याने पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये पदक मिळवले. त्याने महाराष्ट्राचा ७२ वर्षांचा ऑलिम्पिक पदक जिंकण्याचा दुष्काळ संपवला. कोल्हापुरच्या या सुपुत्राला आता अर्जून पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याचबरोबर भारताला पहिले सुवर्णपद जिंकून देणारे मुर्लिकांत राजाराम पेटकर यांना अर्जून जिवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मुर्लिकांत पेटकर यांचा प्रवास खूप प्रेरणादायी राहिला आहे. त्यांनी १९७२ साली जर्मनीमध्ये झालेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतासाठी पहिले सुवर्णपद जिंकले होते. ५० मीटर फ्रीस्टाइल जलतरण शर्यत ३७.३३ सेकंदात पूर्ण करून त्यांनी विश्वविक्रम केला होता. याआधी त्यांना पद्मश्रीने पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



## विनोद कांबळीची रुग्णालयातून सुट्टी

**मुंबई :** भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी नवीन वर्षी रुग्णालयातून घरी परतला आहे. भारतीय संघाच्या नवीन एकदिवसीय जर्सीतील विनोद भिंवडीतील आकृती रुग्णालयातून बाहेर पडला तेव्हा चाहते आणि मीडियाने एकच गर्दी केली होती. विनोद कांबळी याच्या प्रकृतीच्या अनेक तक्रारींनंतर २१ डिसेंबरला त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यावेळी, भारताची निळी जर्सी घालून विनोद बाहेर आला तेव्हा त्याच्या हातात क्रिकेटची बॅटही होती. आणि त्याने उपस्थितांना ती चालवूनही दाखवली. दरम्यान, कांबळींनी रुग्णालयातून निघताना एक पत्रकार परिषद घेतली. तेव्हा तो म्हणाले की, या डॉक्टरांनी मला बरे केले आहे. मी स्वत:लाच वचन दिले होते की, बरा होईन तेव्हाच घरी जाईन. आता मी बरा झालो आहे. आणि शिवाजी पार्कला परत जाणार आहे. मी विनोद कांबळी आहे आणि माझ्यातील क्रिकेट अजून संपलेले नाही, हे मला लोकांना दाखवून द्यायचे आहे. मी फक्त चौकार आणि षटकारच मारतो, असे विनोद विनोदाने म्हणाला.

### ‘राष्ट्रीय फिल्ड आर्चरी’ धनुर्विद्या स्पर्धा

# महाराष्ट्राच्या खेळाडूंचा देशात डंका





**। लखनौ । प्रतिनिधी ।**

१५ वी राष्ट्रीय इनडोअर धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धा २०२४-२५ उत्तरप्रदेश राज्याची राजधानी लखनौ येथे नुकतीच संपन्न झाली. स्पर्धेत महाराष्ट्राच्या धनुर्धरांनी उत्तरप्रदेशात आपल्या नेमबाजीचे कर्तब दाखवीत वर्चस्व सिद्ध केले आहे. या राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत संपूर्ण देशातून स्पर्धेसाठी निवड झालेल्या सुमारे १ हजार धनुर्धरांवर मात करीत महाराष्ट्राच्या संघाने अजिंक्यपद पटकावले आहे. तर, दुसऱ्या स्थानावर उत्तरप्रदेश आणि तिसऱ्या स्थानावर पुद्दुचेरीला समाधान मानावे लागले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राने सलग १५ वेळा अजिंक्यपदाला गवसणी घातली आहे.

या स्पर्धेतील नाईन स्पॉट हा रोख पारितोषिक असणारा प्रकार आकर्षण ठरला आहे. या प्रकारात संपूर्ण देशातील तब्बल २८ धनुर्धर आपले कौशल्य दाखविण्यासाठी सहभागी झाले होते. बाद फेरी असणाऱ्या या प्रकारात महाराष्ट्राच्या अखिलेश भोसले या धनुर्धराने उत्तरप्रदेशच्या गुरुविंदर सिंगवर मात करीत १ लाखाचे पारितोषिक पटकावले आहे. अखिलेश याने सलग दुसऱ्यांना ही स्पर्धा जिंकली आहे. १५ व्या राष्ट्रीय इनडोअर धनुर्विद्या स्पर्धेतील नाईन स्पॉट प्रकारात जिंकण्यासाठी अखिलेश आणि गुरुविंदर यांना तब्बल पावणे दोनशे बाण मारून आपल्या २६ प्रतिस्पर्ध्यांवर मात करावी लागली. तसेच, या स्पर्धेचा शेवट क्रीडा रसिकांची उत्कंठा वाढविणारा होता. बेअर बो राऊंड या धनुर्विद्या प्रकारात ७ वर्षाखालील, १० वर्षाखालील, १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील, १९ वर्षाखालील, वरिष्ठ गट आणि ३५ वर्षावरील गटांमध्ये इंडियन राऊंड, रिकर्व्ह राऊंड, कंपाऊंड राऊंड ही राष्ट्रीय अर्चरी अजिंक्यपद स्पर्धा खेळवण्यात आली. या स्पर्धेत प्रथमच ७ वर्षाखालील धनुर्धरांची स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा क्रीडा रसिकांचे आकर्षण ठरली.

### रायगडच्या धनुर्धरांचा अचूक निशाणा



रायगड जिल्ह्यातील १३ धनुर्धारांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेत करण्यात आली होती. रायगडमधील बावलेकर अर्चरी अकॅडमीमधील मुख्य मार्गदर्शक संतोष जाधव, लाभेश तेली यांच्या मार्गदर्शनाखाली या धनुर्धरांनी साजेसा खेळ करीत जिल्ह्याचे नाव देशपातळीवर गाजवले. या खेळाडूंमध्ये कंपाऊंड राऊंड १० वर्षाखालील गटात रुधिरा जाधव सुवर्णपदक, इंडियन राऊंड १० वर्षाखालील गटात अर्जुन म्हात्रे रौप्यपदक, स्वहा कदम रौप्य व सुवर्णपदक, क्षितीका महाले रौप्यपदक, इंडियन राऊंड १४ वर्षाखालील गटात आशय आंग्रे सुवर्णपदक, मुग्धा वैद्य सुवर्ण व कांस्यपदक, अंश पराडकर सुवर्णपदक, दिव्यनिल दत्ता २ सुवर्णपदक, कंपाऊंड राऊंड १४ वर्षाखालील गटात तनीषा वर्तक सुवर्णपदक, अथर्व पाटील रौप्य आणि कांस्यपदक, आरव हलवान रौप्यपदक आणि सई पिळणकर हिने सुवर्णपदक पटकावले आहे. पुरुष वरिष्ठ गटात कंपाऊंड राऊंडमध्ये लाभेश राजेंद्र तेली यांनी रौप्य आणि कांस्यपदक पटकावले आहे.

## ‘द्विस्तरीय कसोटी मालिका हव्यात’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी आयसीसी कसोटी अजिंक्यपद स्पर्धा दोन स्तरांवर घेतली गेली पाहिजे, असे म्हटले आहे. कसोटी क्रिकेट टिकून राहण्यासाठी हे आवश्यक आहे, असे शास्त्री यांना वाटत आहे. टी-२० क्रिकेटची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अशावेळी भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या मेलबर्न कसोटीसाठी एमसीजीवर पाच दिवसांत विक्रमी ३ लाख ७३ हजार ६९१ लोकांनी गर्दी केली. १९३६-३७ च्या ॲशेस मालिकेतील कसोटीचा विक्रम यंदा ८० वर्षांनंतर मोडीत निघाला असल्याचे ते म्हणाले. तसेच, हा धागा पकडूनच लोकांना काय बघायला आवडते याचा अंदाज घेऊन शास्त्री यांनी दोन स्तरावर ही स्पर्धा घेण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. ‘मेलबर्न कसोटीला विक्रमी प्रेक्षक लाभले. यातून हेच सिद्ध होते की, तुल्यबळ प्रतिस्पर्धी असतील तर सामन्याला प्रेक्षक येतात. क्रिकेटममधील हा सगळ्यात चांगला आणि सगळ्यात आव्हानात्मक प्रकार आहे. तो टिकून ठेवायचा असेल तर अजिंक्यपद स्पर्धा द्विस्तरीय हवी,’ असे शास्त्री यांनी म्हटले आहे.

## गौतमची ‘गंभीर’ पत्रकार परिषद

**सिडनी :** शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या सिडनी कसोटीला आता भारतीय संघाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. अशावेळी कसोटीच्या आधी होणाऱ्या पत्रकार परिषदेला मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर सामोरे गेला. आकाशदीप पाठीच्या दुखण्यामुळे निवडीसाठी उपलब्ध नाही. बाकी सगळे खेळाडू तंदुरुस्त आहेत, गंभीरने आल्या आल्याच पत्रकारांना सांगितले. गंभीरसाठी पत्रकारांकडे गुरुवारी भरपूर प्रश्न होते. त्यातल्या काहींची गंभीरने स्पष्ट उत्तरे दिली. संघाच्या बैठकांमध्ये सध्या एकमेव गोष्टीवर चर्चा सुरू आहे. आणि ती म्हणजे पुढील कसोटी कशी जिंकायची. या कसोटीचे संघासाठी असलेले महत्त्व तुम्हाला सगळ्यांना माहीत आहे, असे गंभीर म्हणाला.



## पीएनपी शाळेचा तृतीय क्रमांक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानात मुरुड तालुक्यातील नियोजित तालुकास्तरीय मूल्यमापन समितीने प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीची माध्यमिक मिठागर शाळेची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. मूल्यांकन निकषानुसार शाळेने केलेली सजावट, परिसर स्वच्छता, विद्यार्थी मंत्रिमंडळ कामकाज, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेअंतर्गत निर्माण केलेली परसबाग, महावाचन चळवळ, स्वच्छता मॉनिटर अभियान टप्पा आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडित व्याख्याने, मासिक पाळी व्यवस्थापन, शाळेने सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य, आर्थिक साक्षरता व नव भारत साक्षरता अभियान या सर्व बाबींची पाहणी करून तपासून पडताळणी केली. या तपासणी अंती तालुक्यातील एकूण शाळांमध्ये मिठागरची पीएनपी शाळा ही दुर्गम, ग्रामीण, डोंगराळ भागातील अंशतः अनुदानित असून सुद्धा शाळेतील सर्व कर्मचारी वर्ग, संस्था-शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ मंडळ व माजी विद्यार्थी यांच्या सहकार्याने ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानात तालुक्यातील तिसऱ्या क्रमांकास पात्र ठरली आहे. या यशाबद्दल पीएनपीचे अध्यक्ष जयंत पाटील, खजिनदार नृपाल पाटील, संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, तसेच संस्था पदाधिकारी, मिठागरचे शाळा समिती अध्यक्ष व पदाधिकारी, गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी, केंद्रप्रमुख जितेंद्र मकु व शाळेचे प्रमुख यांनी शाळेचे विशेष अभिनंदन केले आहे.

## किहीम समुद्रकिनाऱ्यावर रंगला बैलगाडीचा थरार..



● अलिबाग तालुक्यातील झिराड येथील हौशी बैलगाडी संघटनेच्यावतीने किहीम-कामत येथील समुद्रकिनारी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या शर्यतीत १३५ बैलगाड्यांनी सहभाग घेतला होता. अंतिम गटात मिलिंद पडवळ यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. यावेळी घोडागाडी शर्यत देखील घेण्यात आल्या होत्या.

## विद्यामंदिरचे वार्षिक स्नेहसंमेलन



**। तळा । वार्ताहर ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर, गो.म. वेदक विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालय तळाचे वार्षिक स्नेहसंमेलन कलासंगम नुकतेच उत्साहात पार पडले. वेदक विद्यामंदिरचे विविध गुणदर्शन कार्यक्रम व उद्घाटन सोहळा दि. २८ डिसेंबर रोजी पार पडला. यावेळी आदर्श शिक्षक सुहास भोईर तर आदर्श विद्यार्थी सार्थक कासार व जान्हवी साळवी यांना सन्मानित करण्यात आले. बालविकास व प्राथमिक विद्यामंदिरचे रंगमंच पूजन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. २९ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. यावेळी आदर्श शिक्षक मुख्याध्यापक सचिन भाटे तर आदर्श विद्यार्थी श्लोक शिर्के व प्रज्ञा महाजन यांना सन्मानित करण्यात आले. तसेच, कनिष्ठ महाविद्यालय रंगमंच पूजन व विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन दि. ३० डिसेंबर रोजी करण्यात आले होते. यावेळी आदर्श शिक्षक पी.एम. गायकवाड व आदर्श विद्यार्थी कस्तुरी तळकर, परेश बावधने, वैष्णवी बेडेकर, उपेंद्र कुलकर्णी, ओमकार बटावळे व जयश्री काप यांना सन्मानित करण्यात आले.

### राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा | अंतिम सामन्यात झंझावाती खेळी

# पुणे ग्रामीणने केली पराभवाची परतफेड

**। सांगली । प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असो.ने युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने ५१व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड कबड्डी स्पर्धेचे आयोजन सांगलीतील सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेत पुणे ग्रामीण आणि ठाणे शहर यांनी अनुक्रमे कुमारी व कुमार गटाचे विजेतेपद पटकावले आहे.**





या स्पर्धेतील कुमारीच्या अंतिम सामन्यात गत उपविजेत्या पुणे ग्रामीण संघाने गत विजेत्या पिंपरी चिंचवडचा प्रतिकार ३२-२५ असा मोडून काढत स्वर्गीय चंदन सखाराम पांडे फिरत्या चषकावर आपले नाव कोरले. या विजयाने पुणे ग्रामीणने गत वर्षातील पराभवाची परतफेड केली आहे. पूर्वार्धात पहिल्या चार मिनिटांत लोण देत ९-१ अशी आघाडी घेतली. पिंपरी चिंचवडने यातून सावरत लोणची परतफेड करीत ही आघाडी कमी केली. विश्रांतीला १८-१३ अशी पुणे ग्रामीणकडे आघाडी होती. विश्रांतीनंतर देखील सामन्यात चुरस पहावयास मिळाली. मात्र, पुणे ग्रामीणने आपल्या हातून आघाडी निसटून दिली नाही. शेवटी ७ गुणांनी पुणे ग्रामीणने सामना जिंकला. वैभवी जाधव, साक्षी रावडे यांच्या झंझावाती चढाया त्यांना प्रतिक्षा लांडगे, सृष्टी मोरे यांची मिळालेली पकडीची साथ यामुळेच हे शक्य झाले.

कुमार गटात ठाणे शहरने पुणे ग्रामीणचा कडवा प्रतिकार ३३-३१ असा पराभव करीत स्वर्गीय प्रभाकर नागो पाटील फिरता चषक आपल्या नावे केला आहे. शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावेधक ठरलेल्या या सामन्यात पूर्वार्धात २४-१० अशी आघाडी ठाणे संघाकडे होती. उत्तरार्धात पुण्याने विजयासाठी ठाण्याने चांगलेच झुंजविले. शेवटची पाच मिनिटे पुकरली तेव्हा ३२-२६ अशी ठाण्याकडे आघाडी होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुरसाच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)